कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## सोन्याचा भाव घसरला

**नवी दिल्ली :** सोन्याचा भाव ०.८ टक्क्यांनी घसरून प्रति १० ग्रॅम १ लाख २२ हजार ४०० वर उघडला. मागील व्यवहारात तो १ लाख २३ हजार ४५१ होता. सोन्यासोबतच चांदीचा भावतही मोठी घसरण झाली आहे. चांदी तब्बल ३.०९ टक्क्यांनी घसरून १ लाख ४२ हजार ९१० प्रति किलोवर उघडली. मागील सत्रात चांदी १ लाख ४७ हजार ४७० प्रतिकिलोवर होती. सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सोन्याचा भाव ७७१ रुपयांनी घसरून १ लाख २२ हजार ६८० प्रति १० ग्रॅमवर आला, तर चांदी ५७६ रुपयांनी घसरून १ लाख ४६ हजार ८९४ प्रतिकिलोवर व्यवहार करत होती.

## मराठी अभिनेत्याची आत्महत्या

**पुणे :** मराठी चित्रपटसृष्टीसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. सचिन चांदवडे (२५) असे त्या अभिनेत्याचे नाव असून त्याने राहत्या घरी गळफास घेत जीवन संपवले आहे. पुणे आयटी पार्कमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेला सचिन हा जमतारा या नेटफ्लिक्सवरील प्रसिद्ध वेबसिरीजमध्ये झळकला होता. तसेच, आता आगामी जमतारा २ वेबसिरीजमध्ये आणि असुरवन या चित्रपटात त्याने भूमिका केल्या आहेत. हे दोन्ही चित्रपट लवकरच रिलीज होणार आहेत. तो दिवाळीनिमित्त त्याच्या जळगाव जिल्ह्यातल्या पारोळा तालुक्यातील उंदिरखेडे गावी आला होता. तिथे त्याने शुक्रवारी (दि.२४) गळफास घेतला. तीन दिवसानंतर अखेर त्याची प्राणज्योत मालवली.

# जि.प. निवडणुकीत जागावाटपावरुन

# महायुतीत कलगीतुरा

## राष्ट्रवादीचा स्वबळाचा नारा बुलंद




**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी महायुतीत जागावाटपावरून तणाव वाढला असून, तिन्ही पक्षांमध्ये तीव्र मतभेद उफाळले आहेत. भाजपाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार भाजपला २४, शिवसेना शिंदे गटाला २४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला फक्त ११ जागा देण्याचे सूत्र मांडले गेले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने हा प्रस्ताव ठामपणे नाकारत समान २० जागा मिळाल्याशिवाय युती शक्य नाही, अशी भूमिका घेतली आहे. या भूमिकेमुळे महायुतीचे गणित बिघडले असून, रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यामुळे तिन्ही पक्षांमध्ये जागावाटपावरून कलगीतुरा रंगला आहे.

नुकतेच भाजपाने मांडलेल्या प्रस्तावात प्रत्येक आमदाराला ८ जागांच्या प्रमाणात वाटप करण्याचे सूत्र मांडले गेले आहे. रायगड जिल्ह्यात भाजपकडे ३ आमदार असल्याने त्यांना २४ जागा, शिवसेनेकडे ३ आमदार असल्याने त्यांनाही २४ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडे १ आमदार असल्याने ८ जागा आणि त्यांचा एक खासदार असल्याने आणखी ३ जागा असे एकूण ११ जागांचे गणित मांडले आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसने हा हिशोब थेट नाकारला आहे. यावेळी पक्षाच्या जिल्हा नेतृत्वाने ठाम •➤पान २ वर

**जिल्हा परिषदेच्या जागांवर दृष्टीक्षेप**

| तालुके | जागा |
|---|---|
| पनवेल | ०८ |
| कर्जत | ०६ |
| खालापूर | ०४ |
| सुधागड | ०२ |
| पेण | ०५ |
| उरण | ०४ |
| अलिबाग | ०७ |
| मुरूड | ०२ |
| रोहा | ०४ |
| तळा | ०२ |
| माणगांव | ०४ |
| म्हसळा | ०२ |
| श्रीवर्धन | ०२ |
| महाड | ०५ |
| पोलादपूर | ०२ |
| एकूण – | ५९ |

## राष्ट्रवादीच्या घड्याळात 'वाजले की बारा'

**नागपूर :** नागपुरातून एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या नागपूर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची दिवाळी स्नेहमीलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी कार्यालयात लावणीचे सादरीकरण करण्यात आले. त्यामुळे आता राजकारणात नवा वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याप्रकरणी पक्षातील एका नेत्याने स्पष्टीकरण दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेशपेठ येथील राष्ट्रवादीच्या कार्यालयात रविवारी (दि.२६) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दिवाळी स्नेहमीलन कार्यक्रमात शिल्पा शाहीर यांनी नृत्य सादर केल्याचे एका व्हिडीओतून दिसून आले आहे. शिल्पा शाहीर नृत्यांगना असून त्या राष्ट्रवादीच्या पदाधिकारी असल्याच्या •➤पान २ वर



## वेधक

### चंदीगड एक्स्प्रेसमधून प्रवासी पडला

**पालघर :** भाईदर खाडी परिसरात रविवारी (दि.२७) दुपारी चंदीगड एक्स्प्रेसमधून एक प्रवासी खाली पडल्याची घटना घडली आहे. प्रवासी खाली पडल्याचे लक्षात येताच एक्सप्रेसमधील गार्ड तात्काळ खाली उतरून जखमी प्रवाशाला मदत करू लागला. मात्र, त्याचवेळी लोको पायलटने गाडी पुढे नेल्यामुळे गार्ड आणि पायलट यांच्यातील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून आला. या घटनेमुळे काही काळ चंदीगड एक्स्प्रेस एकाच ठिकाणी थांबून राहिली. परिणामी प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले. तसेच, या विलंबाचा परिणाम पश्चिम रेल्वेच्या वाहतूक व्यवस्थेवर देखील झाला. रेल्वे प्रशासनाकडून या घटनेची चौकशी सुरू आहे.

### मुंडेंच्या वारसदारावरून चांगलीच खडाजंगी


**बीड :** बीडमध्ये काही दिवसांपूर्वी ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली होती. या सभेमध्ये बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी मोठे वक्तव्य केले होते. गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारस म्हणून त्यांनी धनंजय मुंडे यांचा उल्लेख केला होता. त्यानंतर भुजबळांच्या या वक्तव्याची राज्यभरात चांगलीच चर्चा सुरू आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना प्रकाश महाजन यांनी भुजबळ यांच्यावर चांगलाच हल्लाबोल केला. भुजबळ चुकीचे बोलत आहेत. धनंजय मुंडे नाही तर पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडे यांच्या खऱ्या राजकीय वारस आहेत, असे प्रकाश महाजन यांनी म्हटले होते. तर, दुसरीकडे मात्र करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे हेच गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारस असल्याचे म्हटले आहे.

### लिव्ह इन पार्टनरची हत्या

**दिल्ली :** दिल्लीत युपीएससीची तयारी करणाऱ्या एका ३२ वर्षीय तरुणाचा घरातील सिलिंडर स्फोटानंतर लागलेल्या आगीत मृत्यू झाला होता. त्याचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत फ्लॅटमध्ये आढळून आला होता. सुरुवातीला ही घटना शॉर्ट सर्किटने घरात आग लागल्याची किंवा गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे झाल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु, तपासात अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. दिल्लीच्याच अमृता राव (२१) हिने लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या पार्टनरची पूर्वनियोजित पद्धतीने हत्या केली आहे. रामकेश मीना असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. रामकेश मीना याचा मृतदेह आढळल्यानंतर पोलिसांनी अमृता चौहान सह तिचा आधीचा प्रियकर सुमित कश्यप आणि त्याचा मित्र संदीप कुमार या दोघांनाही अटक केली आहे.

# महाराष्ट्रावर 'मेथी'चे संकट

■ **वादळाचा कोकण किनारपट्टीला तडाखा बसणार?**



**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्रावर सध्या मोठे संकट घोंघावत आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या मेथी चक्रीवादळाचा तडाखा कोकण किनारपट्टीला देखील बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचे जोरदार पुनरागमन झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. दरम्यान, आता महाराष्ट्रावर सध्या मोठे संकट घोंघावत आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या मेथी चक्रीवादळाचा तडाखा कोकण किनारपट्टीला देखील बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, तर अरबी समुद्रातील कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर तीव्र दाबात होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम म्हणून कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर अधिक वाढण्याची शक्यता आहे. कोकणासह मुंबई व इतर जिल्ह्यांमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. दुसरीकडे समुद्रातील वादळ सदृश्य परिस्थितीचा फटका हा आता गणपतीपुळेच्या समुद्रकिनाऱ्याला बसला आहे. गणपतीपुळेच्या समुद्रकिनाऱ्यावर जोरदार वादळाला सुरुवात झाली आहे. गणपतीपुळ्यातील समुद्र चांगलाच खवळला असून उंच लाटा याठिकाणी पहायला मिळित आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी किनाऱ्यावरील पर्यटकांना बाहेर काढले आहे. गेल्या काही दिवसांपासून समुद्रात वादळ सदृश्य परिस्थिती असून, सध्या रत्नागिरीसह आजूबाजूच्या परिसरात जोरदार वाऱ्यासह पाऊस सुरू आहे.



## तहानलेल्यांना बैलगाडीचा आधार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पावसाळा कागदोपत्री संपला असला तरी ऑक्टोबर महिन्यातही पावसाच्या सरी बरसत आहेत. काही ठिकाणी प्रचंड प्रमाणात पाणी साचले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्याचबरोबर तलाव, धरण आणि नद्या तुडुंब भरल्या असून, जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. तरीदेखील करंजाडे परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई भीषण झाली आहे. त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

नागरिकांना बैलगाडीचा आधार घेत पाणी विकत आणावे लागत आहे. त्यांना दोनशे लीटरच्या पाण्याच्या पिंपासाठी तब्बल चारशे रुपयांपर्यंत खर्च करावा लागत आहे. आता नुकताच हिवाळा सुरु झाला असून, पुढील दहा महिन्यांत पाणी उपलब्धतेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करेल, अशी भीती करंजाडे ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. या समस्येला संबंधित प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या पाण्याच्या नियोजनाअभावी येथील नागरिकांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या टंचाईकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.

## अजित पवारांना मोठा धक्का

**| नांदेड | प्रतिनिधी |**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे राज्यातील राजकीय वातावरण सध्या ढवळून निघाले आहे. स्थानिक नेते उमेदवारीची सोय करण्यासाठी वरिष्ठांच्या गाठीभेटी घेत आहेत. तर, काही नेते हे आपली राजकीय सोय पाहून पक्षांतर करताना दिसत आहेत. आजी-माजी नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य पक्षबदल करत आहेत. असे असतानाच आता नांदेड जिल्ह्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर यांच्यासह मोठा गट काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश करणार आहे. यामध्ये ४ माजी नगराध्यक्ष, •➤पान २ वर

## मुंबई-भागलपूर रेल्वेचे दोन भाग



**| उत्तर प्रदेश | वृत्तसंस्था |**

उत्तर प्रदेशातील चित्रकूट येथे एक मोठा रेल्वे अपघात झाला. मुंबईहून भागलपूरला जाणारी लोकमान्य टिळक भागलपूर एक्स्प्रेस दोन भागात विभागली गेली. एका जोडणीत तुटल्याने मागील तीन डबे वेगळे झाले. ट्रेनचा वेग कमी असल्याने अपघात टळला. चार तासांनंतर तांत्रिक पथकाने डबे पुन्हा जोडून ट्रेनला सोडण्याची परवानगी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.२६) रात्रीच्या सुमारास माझगव्हाण आणि टिकारिया रेल्वे स्थानकांदरम्यान हा अपघात झाला. सुदैवाने त्यावेळी ट्रेन ताशी फक्त १० किलोमीटर वेगाने धावत होती. या मंद गतीमुळे मोठा अपघात टळला. अपघातानंतर दाब कमी झाल्यामुळे ट्रेन आपोआप थांबली. ट्रेन ज्या ट्रॅकवर जात होती त्या ट्रॅकवर आधीच एक सावधगिरीचा आदेश लागू होता. ही खबरदारी प्रवाशांसाठी सुरक्षिततेचा अंतिम उपाय ठरली.

## मतदारयाद्या संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम राबवावा

■ **'मविआ'ची आयोगाकडे मागणी**

■ **१ नोव्हेंबरला विराट मोर्चाचे मुंबईत आयोजन**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्यातील अगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मतदार याद्यांकरिता विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम राबवावा, अशी मागणी राज्यातील प्रमुख विरोधी राजकीय पक्षांनी केली आहे. तसेच, मविआतर्फे १ नोव्हेंबर रोजी विराट मोर्चाचे मुंबईत आयोजन करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व २९ महानगरपालिका, सर्व २४७ नगर परिषदा, १४७ पैकी ४२ नगर पंचायती, ३४ पैकी ३२ जिल्हा परिषदा आणि ३५१ पैकी ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका नियत असून, या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने प्रक्रिया सुरू केली आहे. या निवडणुकांकरिता तयार करण्यात आलेली मतदार यादी प्रभागनिहाय विभागून वापरली जाते. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलैपर्यंत अद्ययावत केलेल्या महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघांच्या मतदार याद्यांची मागणी केली आहे व त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने या कार्यालयाच्या माध्यमातून या याद्या राज्य निवडणूक आयोगाला उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांच्या एका संयुक्त शिष्टमंडळाने १४ ऑक्टोबर रोजी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना अध्यक्ष उद्धव ठाकरे, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेत बाळासाहेब थोरात, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी सुभाष लांडे, भारताचा कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी अजित नवले व समाजवादी पार्टीचे आ. रईस शेख आदी शिष्टमंडळ उपस्थित होते. या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी, विधानसभा निवडणुकीकरिता तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांतील चुका दुरूस्त करण्याची मागणी केली आहे. तसेच, निवडणुकांपूर्वी मतदार याद्यांकरिता विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम राबवावा, अशी मागणीदेखील करण्यात आली आहे.

## पंतप्रधान मोदींच्या स्नानासाठी कृत्रिम घाट

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी |**

दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या छटपूजा स्नानासाठी नकली यमुना नदी बनवली जात असल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी केला आहे. वझिराबाद येथील स्वच्छ पाणी जलवाहिनीच्या माध्यमातून कृत्रिम घाटावर आणत पंतप्रधानांना नदीमध्ये स्नान करण्यासाठी व्यवस्था केली जात आहे, असे भारद्वाज यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



त्यांनी सांगितले की, बिहारची निवडणूक डोळ्यासमोर ठेवत मोदी हे छटपूजेदरम्यान वासुदेव घाटावर जाणार आहेत. पूर्वांचलच्या मतदारांना प्रभावित करण्यासाठी ते त्याठिकाणी नदीत स्नान करणार आहेत. यमुनेचे पाणी प्रदूषित असल्यामुळे त्यांच्या स्नानासाठी जलवाहिनीद्वारे पाणी आणले जात आहे. दुसरीकडे पूर्वांचलच्या लोकांसाठी मात्र कोणतीही सोय केलेली नसून त्यांना दूषित पाण्यात स्नान करावे लागणार आहे, या लोकांच्या हिताची जाणीव भाजप सरकारला नाही, असे भारद्वाज म्हणाले.

### केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर

**मुंबई :** भाजपा सरकारने सीबीआय सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा केवळ आपल्या राजकीय फायद्यासाठी गैरवापर केला आहे. अभिनेता सुशांतसिंह राजपूत व पालघर साधू प्रकरणात मविआ सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न भाजपाने केला. सुशांतसिंह प्रकरणाची चौकशी करण्यास सीबीआयला ५ वर्षे लागली. आता पालघर साधू प्रकरणाला किती वर्षे लागणार, असा प्रश्न उपस्थित करून पालघर साधूंची केस सीबीआयकडे देण्यास धर्मवीर-२ सरकारला तीन वर्षे का लागली? आता साधु हत्येच्या विषयाचा राजकीय उपयोग महायुतीसाठी संपला का? असे सवाल काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत यांनी विचारले आहेत. ते टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

**रूग्णांना वेळेवर औषधोपचार | जिल्हा एड्स नियंत्रणाची जनजागृती**

# एचआयव्ही बाधितांची संख्या घटली

**| पनवेल | प्रतिनिधी |**



एचआयव्ही रोखण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणा करत असलेल्या कार्याला यश आले आहे. जिल्ह्यात गेल्या १० वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या एचआव्हीबाधितांची संख्या ४३६ इतकी होती. आता ही संख्या ११६ वर आली आहे. जिल्हा एड्स नियंत्रण विभागाच्यावतीने नागरिकांमध्ये करण्यात येत असलेल्या जनजागृतीमुळेच ही संख्या घटल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

जिल्हा एड्स नियंत्रण विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, विभागाच्यावतीने २०१४-१५ या वर्षात करण्यात आलेल्या तपासणीत जिल्ह्यात ४३६ जणांना एचआयव्ही संसर्ग झाल्याचे समोर आले होते. आता ही संख्या घटली असून, एप्रिल ते ऑगस्ट या सहा महिन्यांच्या कालावधीत करण्यात आलेल्या तपासणीत ही संख्या ११६ वर आली आहे. मागील वर्षी म्हणजेच एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या वर्षात हीच संख्या ३४३ इतकी होती. एप्रिल ते ऑगस्ट २०२५ या सहा महिन्याच्या कालावधीत जिल्ह्यातील •➤पान २ वर

**रायगड एचआयव्ही बाधित रुग्णसंख्या**

| वर्ष सर्वसाधारण | गरोदर | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ४१७ | १९ | ४३६ |
| २०१५-१६ | ३७४ | २३ | ३९७ |
| २०१६-१७ | ४३७ | २४ | ४६१ |
| २०१७-१८ | ४६० | १६ | ४७६ |
| २०१८-१९ | ३९७ | १३ | ४१० |
| २०१९-२० | ३६१ | १७ | ३७८ |
| २०२०-२१ | २३८ | १४ | २५२ |
| २०२१-२२ | २५७ | १३ | २७० |
| २०२२-२३ | ३४४ | १६ | ३६० |
| २०२३-२४ | ३२३ | १५ | ३३८ |
| २०२४-२५ | ३२६ | १७ | ३४३ |
| एप्रिल ते ऑगस्ट | ११४ | ०२ | ११६ |

**"एड्सबद्दल जनजागृतीसाठी प्रशासन करत असलेल्या प्रयत्नांमुळेच रुग्ण संख्येत मोठी घट होत आहे. या करता गावे, शाळा, कॉलेज या ठिकाणी प्रबोधनपर कार्यक्रम घेतले जात आहेत. शिवाय, चाचण्यांची संख्या वाढवण्यात आली असून आता चांगले औषधोपचार उपलब्ध झाले आहेत."**

**– संजय माने,** जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक

## लाखो रुपयांचे एमडी जप्त

■ **नवी मुंबई एपीएमसी पोलिसांची कारवाई**

■ **मुद्देमालासह तरूणाला अटक**

**| उरण | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत गस्ती पोलिसांनी एका युवकाला अटक केली आहे. त्याच्याकडून २ लाख ८० हजार रुपयांचे एमडी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली असून, याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रमजान इमाम शेख (२५) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. तो तुर्भे इंदिरानगर येथील रहिवासी असून बुधवारी (दि.२२) रात्रीच्या सुमारास अंमली पदार्थ टास्क फोर्सचे गस्ती पथक एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी तुर्भे सेक्टर १९ पामबीच लगत असणाऱ्या महापारेशन कार्यालयासमोर रमजान त्यांना दिसून आला. त्याच्या हालचाली संशयित वाटल्याने गस्त पथकाने त्याला हटकले असता तो घाबरला. मात्र, उसने अवसान आणून उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्या बोलण्यात विसंगती आल्याने पोलिसांनी त्याला पकडून एपीएमसी पोलीस ठाण्यात आणले. त्या ठिकाणी त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे पांढऱ्या रंगाची भुकटी आढळून आली. त्याची तपासणी केली असता तो एडी हा अंमली पदार्थ असल्याचे समोर आले. त्यामुळे त्याच्याविरोधात अंमली पदार्थ विरोधी कायाद्यांतर्गत गुन्हा नोंद करीत रमजान याला तात्काळ अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे २८ ग्रॅम वजनाचा २ लाख ८० किमतीचा एमडी हा अंमली पदार्थ, ४ हजार रुपयांचा मोबाईल, ५ हजार ७१० रुपयांची रोकड असा एकूण २ लाख ८९ हजार ७१० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. रमजानने हा अंमली पदार्थ कोठून आणि कोणासाठी आणला याची चौकशी सुरु आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# सिडकोच्या कर्मचाऱ्यांना सत्यनिष्ठतेची शपथ



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त दि. २७ ऑक्टोबर रोजी सिडको भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी उपस्थित कर्मचारी आणि अधिकारी यांना सत्यनिष्ठतेची शपथ दिली.

याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, डॉ. राजा दयानिधी, गणेश देशमुख, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी, सिडको सुरेश मेंगडे, व्यवस्थापक (कार्मिक) विनू नायर, सिडको एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष सुभाष पाटील यांच्यासह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**●दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त कार्यक्रम**

याप्रसंगी बोलताना विजय सिंघल यांनी दक्षता सप्ताह ही औपचारिकता न राहता दैनंदिन कामकाज पार पाडतानादेखील कर्मचाऱ्यांनी दक्ष राहून पारदर्शकता जोपासायला हवी, असे आवाहन केले. सुरेश मेंगडे यांनी सिडको प्रशासनामधील पारदर्शकता अधिक वाढीस लागावी याकरिता दक्षता विभागातर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

याप्रसंगी राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दक्षता सप्ताहानिमित्त दिलेल्या संदेशांचे वाचन शान्तनु गोयल यांनी केले. त्यानंतर अनिल घेरडीकर, अपर पोलीस उपायुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी 'लाचलुचपत प्रतिबंध' या विषयावर व्याख्यान दिले.

# उरण येथे मोफत वैद्यकीय शिबीर

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतीय नौदलाच्या नौदल सप्ताह उत्सव २०२५ चा भाग म्हणून आयएनएचएस संधानी आणि नौदल स्टेशन करंजा यांच्यावतीने सोमवारी (दि.२७) उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूल, पालक मैदान येथे आरोग्य शिबीर आयोजित केले होते.

या शिबिरात उरण आणि आसपासच्या गावांतील रहिवाशांना आवश्यक आरोग्य सेवा आणि सल्लामसलत मोठ्या प्रमाणात देण्यात आली, ज्यामुळे स्थानिक समुदायाला सुलभ आणि उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा मिळाली.

या शिबिराचे उद्घाटन वेस्टर्न नेव्हल कमांडचे कमांड मेडिकल ऑफिसर सर्जन रिअर ॲडमिरल के.एम. अधिकारी यांच्या हस्ते



करण्यात आले. यावेळी कारंजा येथील वरिष्ठ अधिकारी कमोडोर व्ही.एम.डी. जगन्नाथ, उरण एज्युकेशन सोसायटी (यूईएस) चे अध्यक्ष आणि विश्वस्त आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

या शिबिरात डॉक्टर, शल्यचिकित्सक, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, ईएनटी तज्ज्ञ, नेत्रतज्ज्ञ, दंतवैद्य, त्वचारोगतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, आहारतज्ज्ञ आणि मानसशास्त्रीय सल्लागार अशा समर्पित आरोग्यसेवाव्यावसायिकांच्यापथकानेमार्गदर्शन केले. तज्ज्ञांच्या सल्लामसलतीव्यतिरिक्त या शिबिरात नागरिकांना तपासून मोफत औषधे देण्यात आली. वितरण आणि त्याचप्रमाणे रक्त तपासणीसह आवश्यक मोफत सेवादेखील देण्यात आल्या.

# राणीच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंत

## माथेरान घाटात बांधकामाला वेग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानची 'राणी' अर्थात प्रसिद्ध टॉय ट्रेन लवकरच म्हणजे १ नोव्हेंबरला पर्यटकांच्या सेवेत धावणार आहे. मात्र, सततच्या पावसामुळे घाटातील कड्यावरचा गणपती या ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे मार्ग धोकादायक झाला होता. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने या परिसरात संरक्षण भिंत बांधून मजबुतीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. ही भिंत बांधून झाल्यास माथेरानच्या राणीचा अर्थात टॉय ट्रेनचा मार्ग सुखकर होणार आहे.

सह्याद्रीच्या पर्वत रांगेच्या कुशीतून धावणाऱ्या माथेरानच्या राणीची शीळ लवकरच गुजणार आहे. पर्यटकांची आवडती राणी मान्सून सुट्टीनंतर नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा एकदा पर्यटकांच्या सेवेत धावणार आहे. दरम्यान, मान्सून काळात रेल्वे घाट रस्त्यातील कड्याचा गणपती या परिसरात मोठ्या प्रमाणात उताराच्या भागात झालेल्या भूस्खलनामुळे रुळाजवळील



माती कोसळून रेल्वे मार्ग असुरक्षित झाला होता. या ठिकाणी आता नव्याने सुरक्षा भिंती उभारण्याचे काम केले जात असून, येत्या आठ दिवसांच्या आत काम पूर्ण होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या अभियंता विभागाने कळवली आहे. यासाठी रेल्वे अभियांत्रिकी विभागातील विशेष पथक घटनास्थळी तैनात असून, मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीचा वापर करून काम गतीने सुरु आहे. काम पूर्ण झाल्यानंतर माथेरान राणी ट्रेनचा प्रवास पुन्हा एकदा सुरक्षित आणि सुगम होईल, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

पर्यटकांसाठी ही आनंदाची बातमी ठरणार आहे, कारण गेल्या काही आठवड्यांपासून रुळावरील माती काढण्याचे काम पूर्ण झाले असून, सतत पडणाऱ्या पावसामुळे या कामात व्यत्यय येत आहेत. त्यामुळे सेवेत अडथळा निर्माण झाला होता. मात्र, आता संरक्षण भिंतीच्या बांधकामामुळे माथेरान घाट मार्ग पुन्हा पूर्ववत करण्याचे काम निर्णायक टप्प्यात पोहोचले आहे.

# कर्जत येथे पेरणी भात तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

## किसान क्राफ्टनेकडून कार्यक्रमाचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

किसान क्राफ्टने महाराष्ट्र यांनी कर्जत येथे शेतकऱ्यांसाठी ड्राय डायरेक्ट पेरणी भात (डीडीएसआर) तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. किसान क्राफ्टने या आयएसओ प्रमाणित उत्पादक, घाऊक आयातदार आणि उच्च दर्जाच्या कृषी उपकरणाचे वितरण यांनी महाराष्ट्रातील कर्जत येथे शेतकऱ्यांसाठी कोरड्या थेट पेरणीच्या भातावरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

किसान क्राफ्ट ही एक आयएसओ प्रमाणित उत्पादक गहू कायद्यावर आणि उच्च गुणवत्तेवर कृषी उपकरणांचा वितरक आहे जी अल्पभूधारक असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न पीक उत्पन्न आणि लागवडी क्षेत्र वाढविण्यास मदत करून त्यांचे जीवनमान सुधारण्यास लक्ष केंद्रित करते. अगदी अल्पावधीत किसान क्राफ्ट देशव्यापी सर्वात प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह कंपन्यांपैकी एक बनली आहे. किसान क्राफ्टचे संपूर्ण भारतात वितरण नेटवर्क आहे, ज्यात




देशभरातील ५००० हून अधिक डीलर्स एक उत्पादन युनिट आणि १४ प्रादेशिक कार्यालय आहेत. किसान क्राफ्ट यांच्याकडून कर्जत तालुक्यातील कोरडवाहू शेतकरी यांच्यासाठी शेती प्रशिक्षण आयोजित केले होते. शेतीनिष्ठ शेतकरी विनय वेखंडे यांच्याकडे हे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी किसान क्राफ्टचे सौरभ पाटील, स्मित कदम, बसवराज यादव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शेतकरी विनय वेखंडे, जगदीश पाटील, परम पाटील, चंद्रकांत जाधव, भगवान चव्हाण, कृष्णा चव्हाण, विजय, बळीराम मांडावले, अनिल देशमुख, भरत जाधव आदी उपस्थित होते.

भाताच्या पिकाच्या वाढत्या समस्यांवर मात करण्यासाठी किसान क्राफ्ट ने कोरड्या थेट बियांच्या तांदळाची नवीन जाती विकसित केली आहे. जी समान उत्पादनासह ५० टक्के कमी पाणी वापरतात. सुक्या सरलवानाचा वापर करून शेतकऱ्यांना जमिनीच्या सुपीकतेनुसार उत्पादन जास्त मिळू शकते. लोमिकल भारताचा एक भाग म्हणून आम्ही उत्तर प्रदेशात जीएसआर लागवडीला प्रोत्साहन देत आहोत, असे यावेळी मार्गदर्शनात सांगण्यात आले.

# विमानतळ कृती समितीचा निर्धार

**पनवेल :** लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची बैठक रविवारी वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स क्लबमध्ये झाली. यावेळी 'दिबां'च्या नावासाठी पाठपुरावा सुरूच ठेवण्याचे सर्वानुमते ठरले. यासंदर्भात कृती समितीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार जगन्नाथ पाटील, जे.एम. म्हात्रे, सरचिटणीस दीपक म्हात्रे, संतोष केणे, राजेश गायकर, खजिनदार जे.डी. तांडेल, सदस्य 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, दशरथ भगत, रूपेश धुमाळ, ॲड. भारद्वाज चौधरी यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी राज्य सरकारने ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवलेला आहे

पान १ वरून

## महायुतीत कलगीतुरा

भूमिका घेतली की, खासदार आणि आमदार मिळून आमचे प्रतिनिधित्व कमी नाही. दक्षिण विभागात आमचा प्रभाव प्रबळ आहे. त्यामुळे समान वाटा म्हणून किमान २० जागा मिळाल्याशिवाय युती शक्य नाही. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी '२०-२०-२०' असे समान वाटपाचे सूत्र मांडले असले, तरी शिवसेना व भाजप या दोन्ही पक्षांनी त्यास अमान्य ठरवले आहे.

जिल्ह्यात सध्या पालकमंत्रीपदावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात तीव्र मतभेद आहेत. या वादामुळे दोन्ही पक्षांमधील विश्वास संपुष्टात आल्याचे राजकीय निरीक्षकांकडून सांगण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पालकमंत्र्यांच्या निर्णयांवर आक्षेप घेतला जात आहे, तर शिवसेनेच्या नेत्यांनी राष्ट्रवादीवर थेट वैयक्तिक टीका केली आहे. या आरोप-प्रत्यारोपांमुळे दोन्ही पक्षांतील संबंध पूर्णतः बिघडले असून, युतीचे प्रयत्न जवळपास संपुष्टात आले आहेत. एका वरिष्ठ कार्यकर्त्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, पालकमंत्रीपदावरून दोन्ही पक्षांमध्ये एवढा अविश्वास निर्माण झाला आहे की, निवडणुकीपूर्वी एकत्र येणे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने 'स्वबळावर सत्ता आणू' या घोषवाक्याचा प्रचार सुरू केला आहे. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याने सांगितले की, दरवेळी रायगड जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिन्ही पक्षांत सुरू असलेले जागावाटपाचे राजकारण म्हणजे एक प्रकारची राजकीय शतरंजाची लढाई ठरली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस समान वाट्याची मागणी करत ठाम उभी आहे, तर शिवसेना आणि भाजप त्यांच्या प्रभावाच्या जोरावर अधिक जागांवर दावा करत आहेत. पालकमंत्रीपदावरील संघर्ष आणि परस्पर टीकेमुळे वातावरण अधिक तापले असून, महायुती होण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष निवडणुकीपूर्वी काही तडजोडीचा तोडगा निघतो का, की तिन्ही पक्ष स्वबळावर लढाईला उतरतात, याकडे लागले आहे.

## राष्ट्रवादीच्या घड्याळात 'वाजले की बारा'

स्थानिक नेत्यांचे म्हणणे आहे. त्यात त्यांनी 'वाजले की बारा' या लावणीवर ठेका धरला असून, हा व्हिडीओ वायरल झाल्यावर वाद होण्याची शक्यता आता वर्तवण्यात आली आहे. याप्रकरणी बोलताना अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष अनिल अहिरकर यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी मुख्यमंत्री यांच्यासमोर सुद्धा लावणी होते. त्यामुळे यात काही गैर वाटत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. मात्र, राष्ट्रवादीच्या कार्यालयातच लावणीचा कार्यक्रम झाल्यानंतर अनेक प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत.

## एचआयव्हीबाधितांची संख्या घटली

जवळपास ४७ हजार २८१ इतक्या रुग्णांची एचआयव्ही समुपदेशन व तपासणी करण्यात आली. यामध्ये ११४ जण एचआयव्ही संसर्गित असल्याचे आढळून आले आहे. याच कालावधीत २३ हजार ६१२ गरोदर महिलांची एचआयव्ही समुपदेशन व चाचणी करण्यात आली. त्यामध्ये २ गरोदर माता एचआयव्ही संसर्गित आढळून आल्या. तर, १३ बालकांची १८ महिन्यांनंतर करण्यात आलेल्या तपासणीत करण्यात आली. यात एकाही बालकाला एचआयव्हीचा संसर्ग झाला नसल्याचे स्पष्ट झाले.

जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या तीन एआरटी केंद्रासह ११ एआरटी केंद्रांमध्ये आतापर्यंत झालेल्या प्री एआरटी नोंदणीपैकी ८ हजार ३२१ लोकांना एआरटी उपचार चालू करण्यात आले आहेत. त्यापैकी ४ हजार ४२४ लोक रायगड जिल्ह्यामध्ये एआरटी उपचार घेत आहेत. नियमित उपचार घेत असलेल्या व आवश्यकता असलेल्या रुग्णाची दर सहा महिन्यांतून एकदा तसेच आवश्यकतेनुसार वर्षातून एकदा सीडी ४ काऊंट तपासणी केली जाते. एकही व्यक्ती उपचारापासून वंचित राहणार नाही, याकरता जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत विशेष लक्ष दिले जाते. ही सुविधा पूर्णपणे मोफत दिली जाते.

## अजित पवारांना मोठा धक्का

२३ माजी नगरसेवक, ८ नगरसेवक, २ माजी जिल्हा परिषद सदस्य यासह माजी पंचायत समिती सभापती यांचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पदाधिकारी थेट काँग्रेसमध्ये जात असल्याने अजित दादांसाठी नांदेडमध्ये हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. मंगळवारी (दि.२८) नांदेडच्या देगलूर येथे त्यांचा काँग्रेस पक्षप्रवेश होणार आहे.

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-08102025-266753
CG-DL-E-08102025-266753

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 4422] नई दिल्ली, मंगलवार, अक्तूबर 7, 2025/आश्विन 15, 1947
No. 4422] NEW DELHI, TUESDAY, OCTOBER 7, 2025/ASVINA 15, 1947

**सडक परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

**नई दिल्ली, 7 अक्तुबर, 2025**

का.आ.4550(अ).- केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में. NH753F के. कि.मी. ० से कि.मी. 18.6 (उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव) तक के भू-खण्ड के निर्माण (चौंडीकरण/पेव्ड शोल्डर सहित २-लेन/४-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है ।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख के इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा ।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् उपविभागीय अधिकारी माणगाव को लिखित रूप मे प्रस्तुत की जाएगी और उसमे उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तीकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा ।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा ।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है ।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH753F के. कि.मी. ० से कि.मी. 18.6 (उपविभागीय कार्यालय, माणगाव जिला रायगड) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण

राज्य नामःमहाराष्ट्र जिले का नामःरायगड

| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **तालुका का नाम : माणगाव** | | | | | |
| **गांव का नाम : सुर्लेवाडी** | | | | | |
| १ | Old Sr.no. 28 Part New Sr. no. 9/1/A/2 | निजी | पड | ०.२२ (हेक्टेयर) | ०.२२ |
| Total | | | | | 0.22 |

(फा.सं.12037/38/2017-MAH(P-6)/3A)
**शेख अमीनखान, निर्देशक**

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

**New Delhi, the 7 th October, 2025**

S.O.4550 (E)- In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening / two lane with paved shoulder / four laning etc.,), maintenance, management and operation of NH753F in the stretch of land from Km. 0 to Km. 18.6 (Sub Divisional Officer, Mangaon, Kacheri Road, Tal. Mangaon, Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Mangaon in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH753F in the stretch of land from Km. 0 to Km. 18.6 (Sub Divisional Office, Mangaon, Dist. Raigad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA

**State:MAHARASHTRA** **Distriet: RAIGAD**

| Sr. No | Survey/ Plot Number | Type of land | Nature of land | Area ( in Local Unit) | Area (in Hectares) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **Taluk : Mangaon** | | | | | |
| **Village : Surlewadi** | | | | | |
| 1 | Old Sr.no. 28 Part New Sr.no. 9/1/A/2 | Private | Dry | 0.22 (Hectare) | 0.22 |
| **TOTAL** | | | | | **0.22** |

**( F.No. 12037/38/2017/MAH(P-6)/3A)**
**SHAIKH AMINKHAN, Director**

# भातपिकाला कोंब, पेंढाही शेतातच कुजला

**रायगड जिल्ह्याला मागील आठवडाभरापासून कोसळणाऱ्या परतीच्या पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. दिवसभर उन्ह आणि सायंकाळनंतर ढगाळ वातावरण तयार होऊन वादळीवाऱ्यासह येणाऱ्या पावसात कापणीसाठी तयार झालेल्या भातशेतीचे नुकसान झाले आहे. कापलेले भातपीक शेतातच राहिल्याने त्याला कोंब आले असून, पेंढा भिजल्याने तो कुजण्याची भीती आहे. त्यामुळे आगामी काळात गुरांच्या पेंढ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे.**

## फक्त घोषणा नको, तात्काळ मदत द्या : शिवराम महाबळे

**| कोलाड | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यात काही ठिकाणी वाऱ्या पावसामुळे उभी पिके शेतात आडवी झाली आणि धानाची मोत्यासारखी कणस चिखलात गाढली गेली. कापणी केलेले पीक त्याची कडपे पावसात भिजल्याने मोड आले, साठवलेले धान्य ओलाव्याने नासधूस झाले आहे. शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावूनच गेल्यामुळे त्याच्या डोळ्यात अश्रूंचे पाट वाहू लागले असून, तो हताश आणि चिंतेत आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या पिकांचे वेळेत पंचनामे करून नुसत्या घोषणा न करता, शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या, अशी मागणी शेकाप रोहा तालुका चिटणीस शिवराज महाबळे यांनी सरकारकडे केली आहे.

रोहा तालुक्यातील कोलाड, खांब, देवकान्हे, धामणसई भागातील शेतकऱ्यांचे काढणीला आलेल्या पिकाचे पूर्णतः नुकसान झाले आहे. शेकडो हेक्टर शेतजमिनीतील पीक अक्षरशः चिखलात आडवे पडले आहे. काही पिकांची पूर्णतः नासाडी झाली. त्यामुळे त्यांच्या कुटुंबांवर उपासमारी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बळीराजाचे डोळे आता नुकसानभरपाई आणि मदतीकडे लागलेले आहेत. त्यामुळे शेतकरी बळीराजाला नुसती घोषणा नको तर त्याच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून त्याला ताबडतोब मदत द्यावी, अशी मागणी करण्यात येत असून रोहा प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना लेखी निवेदनातून करण्यात येणार असल्याचे शिवराम महाबळे यांनी सांगितले.



● मुरुडमधील भातशेतीची पावसामुळे झालेली दैनावस्था.

## पावसामुळे शेतकरी देशोधडीला


**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात मागील अनेक दिवसांपासून झालेल्या अवकाळी आणि मुसळधार पावसामुळे भातशेतीचे १०० टक्के नुकसान झाले असून, शेतकरी पूर्णपणे आर्थिक संकटात सापडला आहे. या गंभीर नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांनी थेट राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना पत्र लिहून तात्काळ विशेष हेक्टरी मदत पॅकेज देण्याची मागणी केली आहे.

प्रसाद भोईर यांनी पत्रात म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी प्रचंड आशेने केलेली भातशेती काढणीच्या तोंडावर पाण्यात बुडाली. शेतामध्ये पाणी साचल्याने भातपिके कुजली आहेत, कणसांना जागेवरच कोंब फुटले आहेत, तर काही ठिकाणी शेतजमीन वाहून गेली आहे. शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनत आणि गुंतवणूक अक्षरशः एका झटक्यात पाण्यात गेली आहे, शेतकरी पुरता उध्वस्त झाला आहे, जगावे की मरावे अशी अवस्था त्याची झालीय असे त्यांनी नमूद केले.

प्रसाद भोईर यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये कुठलाही निकष न लावता तातडीने सरसकट पंचनामे सुरू करावेत आणि १० दिवसांच्या आत अहवाल सादर करावा. महाराष्ट्रातील जिल्ह्यांप्रमाणेच रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विशेष मदत म्हणून त्वरित मंजूर करून थेट रक्कम जमा करावी. कृषी आणि महसूल विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून नुकसानीचा सविस्तर अहवाल द्यावा. भविष्यात शेतकऱ्यांना पुन्हा शेतीत उभे राहता यावे यासाठी 'चालू पीक कर्ज माफ करून' पुढील हंगामासाठी पुनर्गठित मदत योजना जाहीर करावी, या मागण्यांचे निवेदन कृषीमंत्री भरणे यांना दिले आहे.

## परतीच्या पावसाने शेतकरी हवालदिल



**| नेरळ | प्रतिनिधी |**

ऑक्टोबर महिना संपत आला तरी पावसाळा संपत नाही आणि लांबलेल्या पावसामुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात कापून ठेवलेले तर काही ठिकाणी शेतात उभा असलेले भातपीक शेतात कोसळले आहे. तालुक्यात ९० टक्के भाताचे पीक पाण्यात डुबले असून, भाताच्या पिकाला मोड येण्याची शक्यता आहे. दरम्यान, पाऊस कधी थांबणार याकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत.

पावसासोबत सोसाट्याच्या वारा देखील येत असल्याने शेतकऱ्याच्या शेतातील भाताचे पीक पाण्यात आहे. भाताच्या तयार झालेल्या पिकाचे मोठे नुकसान होत असून, भाताचे पीक पाण्यात तरंगत असल्याचे तालुक्यात दिसून येत आहे. त्यात काही ठिकाणी किमान १५ दिवस भाताचे पीक पाण्यात कोसळले असल्याने त्या भाताच्या पिकाला मोड येण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे भाताचे पीक वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाताचे पीक शेतात कोसळले आहेत. आजुबाजूला अशीच परिस्थिती असून, भाताचे पीक हातातून जाण्याची आम्हा शेतकऱ्यांना भीती वाटत आहे, अशी प्रतिक्रिया नेरळ खांडा येथील शेतकरी अनंता भोईर यांनी व्यक्त केली.

## ओला दुष्काळ जाहीर करा

### भाजपाचे मुरुड तहसीलदारांना निवेदन

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

गेल्या काही दिवसांपासून पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे भातपीक भिजून, वाहून नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात येऊन नुकसानभरपाई द्यावी. याबाबत भाजपाने मुरुड तहसीलदार आदेश डफळ यांना निवेदन दिले आहे.

अवकाळी पावसामुळे मुरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे खरीप व रब्बी दोन्ही हंगाम फुकट गेलेले आहेत. झालेल्या अतिवृष्टीमुळे हातातोंडाशी आलेले पीक वाहून गेले व आता पुढील हंगामाकरिता शेतात पाणी असल्यामुळे वाल व तत्सम पिके शेतकरी घेऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे दोन्ही हंगाम फुकट गेले आहेत. भातपिकाचे



नुकसान लक्षात घेऊन शासनाने मुरुड तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, भातपीक नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी भाजपचे शैलेश काते, जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे, सुधीर पाटील, विनोद भगत, अभिजित पानवलकर आदी उपस्थित होते.

## निवडक

### १०९ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**पनवेल** : मावळा ब्रिगेड (नवी मुंबई), मैत्र प्रतिष्ठान (घोडपदेव-भायखळा) आणि एमएसपी फाऊंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर व महाआरोग्य शिबीर पार पडले. यावेळी एकूण १०९ रक्तदाते रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झाले, तसेच ३४९ जणांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी कामोठे शहर मंडल भाजप अध्यक्ष विकास घरत, डॉ.विठ्ठल काळे, दहशतवाद विरोधी पथकाचे बलराज गणप साळोखे, व्यापारी संघटना कामोठे अध्यक्ष नाना मगदूम, मावळा ब्रिगेडचे मार्गदर्शक गणेशशेठ बेरगळ, सल्लागार रवी कदम, पवनकुमार बेरगळ, पांडुरंग यमगर, सुशांत काटकर, कैलाश सरगर, जे.जे. रुग्णालयचे श्री. कदम, श्री. सूर्यवंशी यांच्यासह शिवसेना शहरप्रमुख रामदास गोवारी, उपशहरप्रमुख सचिन त्रिमूखे, राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधर सेल जिल्हाध्यक्ष स्वप्नील काटकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस विद्या तामखडे, एमएसपी फाऊंडेशन संस्थापक मायाप्पा बुधे, मैत्र प्रतिष्ठान कार्याध्यक्ष विशाल बाबर, खजिनदार विलास जाधव, मावळा ब्रिगेडचे संस्थापक संदीप वावरे, सेक्रेटरी लक्ष्मण कारंडे, खजिनदार महेंद्र हिरे, कार्याध्यक्ष दिनेश निलख, उपाध्यक्ष योगेश निलख, संदीप साळुंखे, सचिन शेंबडे, रोहीत कोळेकर यांच्यासह मावळा ब्रिगेडचे सर्व शिलेदार उपस्थित होते.

### नेरळ स्थानकातील उद्वाहन कार्याला गती

**नेरळ** : मध्य रेल्वेवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात प्रवासी वर्गाच्या सेवेसाठी अनेक कामे सुरु आहेत. त्यात फलाट एकवर मंजूर असलेले उद्वाहन उभारण्याचे काम सुरु झाले आहे. उद्वाहन उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून, त्या उद्वाहनचा रंग महिलांचा आवडता रंग गुलाबी असल्यामुळे महिला प्रवासी आनंदल्या आहेत. नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात माथेरान या पर्यटनस्थळी जाण्यासाठी मिनीट्रेन जात असते. त्याचवेळी नेरळ-माथेरान घाटमार्गाने टॅक्सी सेवेच्या माध्यमातून प्रवासी माथेरान येथे जाण्यासाठी नेरळ स्थानकात येत असतात. महिला प्रवासी आणि पर्यटक यांच्यासाठी फलाट दोनवर उद्वाहन उभारण्यात आले होते. मात्र, फलाट एकवर उद्वाहन उभारण्यात आले नव्हते. काही महिन्यांपूर्वी फलाट एकवर उदवाहन उभारण्याचे काम सुरु झाले होते. सध्या त्या उद्वाहन कामाला अंतिम स्वरूप येत असून, नेरळ स्थानकात उभारण्यात येत असलेले उद्वाहन हे वेगळ्या रंगाचे बनले गेल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. गुलाबी हा महिलांचा आवडता रंग असल्याने त्यांनी उभारण्यात आलेल्या उद्वाहनचे कौतुक केले आहे.



## नुकसानीच्या पंचनाम्यांना मुहूर्त कधी?

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नुकसान झालेल्या भातशेतीचे पंचनामे तातडीने करण्याची गरज असतानाच नागोठणे विभागातील काही भागात अद्याप हे पंचनामे सुरू न झाल्याने त्यासाठी महसूल व कृषी खात्याच्या कर्मचाऱ्यांना मुहूर्त केव्हा मिळणार, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. पंचनामे करण्यास विलंब होत असल्याने बळीराजाकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

रोहा तालुक्यातील लागवडीखाली असणाऱ्या भातशेतीचे ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस पडलेल्या मुसळधार पावसाने मोठे नुकसान झाले. नुकसानीबाबतचे रितसर पंचनामे करण्याची मोहीम सुरू झाल्याची माहिती शासकीय यंत्रणेकडून उपलब्ध होत आहे. मात्र असे असले तरी नागोठणे विभागातील ऐनघर, पाटणसई तलाठी सजा अंतर्गत तसेच इतर काही भागात अद्याप शासकीय कर्मचारी पोहोचलेच नसल्याची माहिती रोहा पंचायत समितीचे माजी सभापती आणि पाटणसई येथील प्रगतशील शेतकरी सदानंद गायकर तसेच बाळसई येथील ज्येष्ठ शेतकरी मधुकर ठमके यांनी दिली. पेरणीपासून ते लागवडीपर्यंत घेतलेल्या मेहनतीवर पाणी फिरल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. भातशेती पाण्याखाली असल्याने आणि पंचनामे करण्यासही विलंब होत असल्याने भात कापणी करावी की, नाही अशा द्विधा मनःस्थितीत शेतकरी बांधव असल्याचे सांगून सदानंद गायकर व मधुकर ठमके यांनी शासनावर नाराजी व्यक्त केली.

> रोहा तालुक्यातील १८४ महसूल गावांत भातशेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येणार आहेत. आमच्याकडे केवळ २२ कर्मचारी असल्याने महसूल व ग्रामपंचायत प्रशासनाचे सहकार्य आवश्यक आहे. त्यासाठी रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख व गटविकास अधिकाऱ्यांकडे याविषयी सहकार्य मागितले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अपार मेहनत घेऊन शेती केली आहे त्यांचा किमान झालेला खर्च तरी मिळावा यासाठी सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच पंचनामे करण्यास उशीर होत असेल तर शेतकऱ्यांनी आपल्या भातशेतीचे फोटो काढून ठेवावेत, असेही सांगण्यात आले आहे.
>
> – महादेव करे, तालुका कृषी अधिकारी, रोहा

## मुलीच्या अपहरणाचा पत्नीचा आरोप खोटा

### पती अफताब यांचा प्रसिद्धीपत्रकामार्फत दावा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

मुलीचे अपहरण केल्याचा आरोप करीत पत्नीने वृत्तपत्रात प्रसिध्दी करून बदनामी केली आहे. आई, वडिलांवर केलेले आरोपही पूर्णतः खोटे असल्याचा दावा अफताब नजीर सुबेदार यांनी प्रसिद्धीपत्रकामार्फत केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला एक वेगळे वळण आले आहे.

अफताब नजीर सुबेदार यांच्या म्हणण्यानुसार, त्यांची पत्नी हुमेरा यांच्यासोबत ९ डिसेंबर २०२२ मध्ये मुस्लीम रितीरिवाजानुसार विवाह झाला. दोघांचा संसार दोन ते तीन महिने सुखी समाधानाने झाला. मात्र, त्यानंतर त्यांची पत्नी माहेरी नेण्यासाठी सतत त्यांच्या आई, वडिलांसह अफताब यांच्यासोबत भांडण करू लागली. पत्नी तिच्या आईच्या सांगण्यावरून वेगळे राहण्यास सांगत होती. १२ ऑगस्ट २०२५ मध्ये कामानिमित्त बाहेर असताना त्यांच्या पत्नीने अफताब यांच्या आईला मारहाण करून लग्नातील सोन्याचे दागिने बळजबरीने घेऊन गेले. त्यानंतर अफताब यांच्याशी फोनवर संपर्क साधून त्यांच्याकडे येऊन राहण्यासाठी दबाव टाकण्यात आला होता. १२ ऑक्टोबरला रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास अफताब यांच्या पत्नीने फोन करून तुमची आठवण येते, असे सांगितले. १३ ऑक्टोबरला सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास अलिबाग एसटी स्थानकाजवळ दोघेही भेटलो. त्यावेळी अफताब यांनी त्यांच्या पत्नीला घरी नांदण्यास आग्रह करून कामाला न जाण्यास सांगितले. मात्र, त्यांच्या पत्नीने तुम्हाला सोडून देईन, पण नोकरी सोडणार नाही, असे सांगत यापुढे माझ्या मुलीचे नखसुद्धा दिसू देणार नाही, असे त्या म्हणाल्या. आई, वडिलांना भेटण्यास सांगून पत्नीच्या सहमतीने मुलीला अफताब त्यांच्या घरी घेऊन गेले. सात दिवस अफताब यांच्या ताब्यात त्यांची मुलगी होती. मुलीला १९ ऑक्टोबरला सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अलिबाग पोलीस ठाण्यात देण्यात आले. त्यावेळी पोलिसांकडून जबाब घेण्यात आले. मात्र, मुलीचे अपहरण करून बदनामी करण्याचा आरोप पत्नीने केला आहे. आई, वडिलांसह अफताब यांच्यावर केलेले आरोपही खोटे असल्याचा दावा अफताब यांनी प्रसिध्दी पत्रकामार्फत केला आहे.

## डॉ. संपदा मुंडे आत्महत्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करा



**| पनवेल | प्रतिनिधी |**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना महिला आघाडी पनवेल यांच्या वतीने व उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत पनवेल पोलीस उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले. फलटण जिल्हा सातारा उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा कथित सहभाग व दरम्यान झालेल्या गंभीर प्रशासकीय त्रुटींच्या पार्श्वभूमीवर तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी विधानसभा संघटिका सुजाता कदम, अर्चना शिरसागर, अर्चना कुलकर्णी, संगीता राऊत, मालती पिंगळे, सानिका मोरे, कळंबोली शहर संघटिका ज्योती मोहिते, खांदा कॉलनी उपशहर संघटिका स्मिता घाडगे, पनवेल उपशहरसंघटिका उज्वला गावडे, कामोठे उपशहर संघटिका सुरेखा जाधव, कळंबोली उपशहर संघटिका निशा जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## रस्त्याच्या कामाला वनविभागाची आडकाठी

- **काम सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी**
- **डोंगरगाव विकास संघर्ष समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बारशेत (मोरांडे) रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. मात्र, हा रस्ता वन विभागाच्या जागेतून जात असल्याने त्या कामाला आडकाठी आली आहे. वन विभागाकडून रस्त्याच्या कामाला परवानगी मिळावी, या मागणीसाठी डोंगरगाव विकास संघर्ष समितीने जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली. निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन काम सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असे निवेदन दिले. मधुकर ढेबे यांच्या नेतृत्वाखाली डोंगरगाव, विकास संघर्ष समितीच्या (सत्यवाडी, होन्डावाडी, तागवाडी, बारशेत) वतीने सोमवारी(दि.२७) निवेदन देण्यात आले.

अलिबाग तालुक्यातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीतील बारशेत (मोरांडे) रस्ता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था कार्यकारी अभियंता कार्यालय रायगड यांच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाले आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश ६ डिसेंबर २०२४ मध्ये काढण्यात आला असून, हैदराबाद येथील मे सुधाकरा इन्फ्राटेक प्रा.लि. या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. बारशेत या सहा किलोमीटर ७०० मीटर रस्त्यामध्ये चार गावांचा समावेश असून, सत्यवाडी, होंडावाडी, तागवाडी, बारशेत या वाड्या आहेत. एकूण एक हजार २७ लोकसंख्या आहे. रस्ता डोंगराळ भागातील असल्याने उपजीविका, शिक्षण, बाजारपेठत जाण्यासाठी तसेच दैनंदिन कामकाजासाठी जीव मुठीत घेऊन पायपीट करावी लागत आहे. बारशेत रस्ता मंजूर असताना गेल्या दहा महिन्यांपासून रस्त्याचे काम केले नाही. याबाबत ठेकेदार प्रतिनिधी व उपअभियंता कार्यालयाशी वेळोवेळी संपर्क साधण्यात आला. बारशेत रस्ता वनविभागाच्या जागेतून जात आहे. वन विभागाकडून परवानगी मिळाली नाही. त्यामुळे रस्त्याच्या कामाला सुरुवात करता येत नाही, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. रस्त्याअभावी डोंगरभागात राहणाऱ्या नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. विकासाला अडथळा येत आहे. त्यामुळे रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात यावी, अशी मागणी डोंगरगाव विकास संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली असून, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना सोमवारी निवेदन देण्यात आले.

**उरणमध्ये कार्यकर्त्यांची बैठक | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी**

## आगामी निवडणुकांसाठी शेकाप सज्ज

**| उरण | प्रतिनिधी |**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी शेतकरी कामगार पक्ष सज्ज असून, आपली ताकद दाखवून देऊ, असा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे. तालुक्यातील नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद या निवडणुकांसाठी शेतकरी कामगार पक्षाची विस्तारित बैठक नुकतीच जेएनपीटी टाऊनशिप येथे पार पडली. यावेळी शेकाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना तालुका चिटणीस भाई रवी घरत म्हणाले, उरणमध्ये शेतकरी कामगार पक्षाची पूर्वीपासून ताकद आहे. पंचायत समितीचा सभापती हा शेकापक्षाचाच असतो. महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपण या निवडणुका लढतो आहोत. नगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी शेतकरी कामगार पक्ष सज्ज आहे. महाविकास आघाडीसोबत एकत्रित या निवडणुका आम्ही लढणार आहोत, आमची ताकद दाखवणार आहोत, उरणमध्ये नक्कीच शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीची सत्ता अबाधित राहणार आहे, असे प्रतिपादन शेकाप नेते काका पाटील यांनी केले.

शेतकरी कामगार पक्ष या निवडणुकांमध्ये भरारी घेऊन आपली निश्चितच ताकद दाखवणार आहे. निवडणुका मित्रपक्षांच्या बरोबर राहून लढणार आहोत. सर्वांनी एकत्रितपणे काम केले तर विजय आपलाच आहे, असे माजी उपसभापती महादेव बंडा यांनी सांगितले.

मध्यवर्ती कमिटीचे सदस्य नरेश घरत, सरचिटणीस सुरेश पाटील, माजी पंचायत समिती सदस्य रमाकांत पाटील, ॲड. सागर कडू आदींनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्रल्हाद मडवी, किरण पाटील, यशवंत ठाकूर, भारत थळी, हरेंद्र गावंड, दत्ता घरत, के.एस. ठाकूर, ययाती ठाकूर, डी.बी. ठाकूर, जितेंद्र ठाकूर, यशवंत ठाकूर, राकेश पाटील, अनंत घरत, किरण घरत, महिला आघाडी सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. शेवटी शहर चिटणीस शेखर पाटील यांनी आभार मानले.



### ताकद दाखवून देणार

उरण येथे शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील घटक पक्ष म्हणून शेकापची ताकद दाखवून देणार, असा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. तालुक्यातील सर्व ठिकाणी महाविकास आघाडीची सत्ता अबाधित राहील, अशा प्रकारचे काम पुढील काळात सर्वांकडून करण्यात येईल, असेही यावेळी कार्यकर्त्यांनी बोलून दाखविले. त्यामुळे निवडणुकांसाठी आपण सज्ज असल्याचेही ते म्हणाले.

## महापालिकेचा जाहिरात फलक धोकादायक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेलच्या उड्डाणपुलाला लागूनच पनवेल महानगरपालिकेने लावलेला स्क्रीन बोर्ड (फलक) हा असलेला अपघाताचा फलक होऊ शकतो, त्यामुळे या ठिकाणी स्क्रीन बोर्ड लावू नये, अशी मागणी पनवेलकर नागरिकांकडून होत आहे.

नवीन पनवेलहून पनवेलकडे येणाऱ्या उड्डाणपूलावरुन (उतारावर) येत असताना डाव्या बाजूकडे उड्डाणपुलाला लागूनच असलेल्या ठिकाणी पनवेल महानगरपालिकेने जाहिरातीचा जो स्क्रीन बोर्ड लावला आहे, तो बोर्ड अपघाताचा बोर्ड होऊ शकतो? या स्क्रीन बोर्डावर अजूनही जाहिराती सुरू केल्या नसल्यातरी उड्डाणपुलावरून पनवेलकडे येताना वाहन चालकांचे लक्ष या स्क्रीन बोर्डकडे जाणार, स्क्रीन बोर्डवरील जाहिराती आणि लख्ख प्रकाश वाहन चालकांचे लक्ष वेधणार, उड्डाणपूल आणि स्क्रीन बोर्ड यामध्ये कमी अंतर असल्याने, त्यात उतार, अशा वेळेस अपघात होण्याची शक्यता आहे. पनवेल महानगरात खड्ड्यांचे साम्राज्य असून, त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही मात्र पनवेल महानगरपालिकेने जिथे जागा मिळेल, तिथे स्क्रीन बोर्ड लावण्याचा धडका लावला आहे.



# काँग्रेसने सुधारायला हवे

बिहार निवडणुकांना रंग भरू लागला आहे. पहिला टप्पा येत्या आठवड्यात सुरू होईल. मात्र, राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि डावे पक्ष यांची आघाडी, जी महागठबंधन या नावाने ओळखली जाते, तिच्यात धुसफूस ते धुमश्चक्री असे सर्व प्रकार चालू आहेत. जागावाटपावरून होणारी भांडणे ही भारतात सर्वत्र होतात. भाजपसारख्या शिस्तशीर पक्षात व त्यांच्या आघाडीतही हे घडते. पण गोष्टी जेव्हा हाताच्या बाहेर जातात तेव्हा वरिष्ठ नेत्यांनी हस्तक्षेप करणे व बदनामी टाळणे आवश्यक असते. मात्र या देशाच्या स्वातंत्र्यापासून सत्तेत असलेल्या काँग्रेसला ही गोष्टी उमजू नये हे आश्चर्याचे आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते व लालू यादव यांचे चिरंजीव तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून जाहीर करण्यास काँग्रेसी नेत्यांचा विरोध होता. त्याची कारणे अत्यंत हास्यास्पद होती. बिहारमध्ये लालू यादव यांच्या सत्तेच्या काळात जंगलराज चालू होते असा प्रचार भाजपने प्रस्थापित करून ठेवला आहे. लालू यांच्या काळात यादव समुदायाने गुंडगिरी केली हे खरे असले तरी गेली वीस वर्षे तिथे नितीश व भाजपची सत्ता आहे. त्या काळात गुंडगिरी करणाऱ्यांना जे काय शासन व्हायचे ते होऊन गेले आहे. त्यातील अनेक जणांवर खटले चालू आहेत तर बाकीचे लोक नितीश व भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये जाऊन आता पवित्र झाले आहेत. काही जणांना तर मंत्रिपदेही मिळाली आहेत. त्यामुळे काँग्रेसने आता तोच प्रचार उचलून धरण्याचे कारण नाही. तेजस्वी यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार केले तर महागठबंधनची मते कमी होतील असा अजब युक्तिवाद काँग्रेसवाल्यांनी केला असे म्हणतात. खुद्द राहुल यांनाही त्यांच्या सल्लागारांनी हे पटवले असे दिसते. त्यामुळे त्यांनीही तेजस्वी यांच्या नावाची घोषणा करण्याचे टाळले. अखेर गेल्या आठवड्यात राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोतत यांनी पाटणा येथे संयुक्त पत्रकार परिषदेत तेजस्वी यांच्या उपस्थितीत त्यांचे नाव जाहीर करून या विषयावर पडदा टाकला. पण हे खरे तर आधीच व्हायला हवे होते.

## भाजपकडून शिकण्यासारखे

राहुल गांधी यांनी ऑगस्ट महिन्यात व्होट-चोरीच्या प्रश्नावर तेजस्वी यांच्यासमवेत बिहारभर दौरा केला. त्याला तुफान प्रतिसाद मिळाला. त्यावेळी तेजस्वी यांच्यासमवेत जाण्याने काँग्रेसची वा राहुल यांची छबी मलीन झाली नाही. त्याच तेजस्वी यांचे नाव जाहीर करण्याने आपली मते कमी होतील असे म्हणणे हा केवळ मूर्खपणा किंवा लबाडपणा झाला. वास्तविक तेजस्वी यादव हे २०२०मध्येच मुख्यमंत्री होऊ शकले असते. तेव्हाच राजदला सर्वाधिक जागा होत्या. पण तेव्हा नीतीश यांची मदत घ्यावी लागल्याने व त्यांचा प्रभाव मोठा असल्याने, त्यांच्या जागा अगदी कमी असूनही नीतीश यांना मुख्यमंत्रिपद द्यावे लागले. गेल्या पाच वर्षात नीतीश यांनी पुन्हा एकदा कोलांटउडी मारून भाजपशी हातमिळवणी केली. त्यामुळे त्यांची छबी पार रसातळाला गेली आहे. जनमताच्या कौलांमध्ये तेजस्वी यांनाच मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक पसंती आहे. या स्थितीत राहुल यांनी व्होट चोरी यात्रांच्या काळातच तेजस्वी यांना मुख्यमंत्री म्हणून जाहीर केले असते तर ते अधिक चांगले दिसले असते. या संदर्भात भाजपचे वर्तन पाहण्यासारखे आहे. भाजप आज देशातला बलाढ्य पक्ष आहे. नरेंद्र मोदी यांचा मोठा करिश्मा आहे. तरीही बिहारमध्ये त्यांनी अगदी आजही पडती भूमिका घेतली आहे. नीतीश यांच्या पक्षाची ताकद क्षीण झाली आहे. भाजपला त्याला खलासच करायचे आहे. तरीही आजही नीतीश यांना आपण सन्मानाने वागवत असल्यासारखे तो दाखवत आहे. मोदींनी आपल्या भाषणात अगली बार एनडीए सरकार असे म्हणून नीतीश यांना बाजूला केले असले तरीही व्यासपीठांवरून त्यांचा भरभरून गौरव चालू असतो. महाराष्ट्रात एकट्याच्या बळावर सत्ता येईल इतक्या जागा असूनही भाजपने एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या पक्षांसोबतची मैत्री चालू ठेवली आहे. आगामी पालिका निवडणुकाही शक्य तिथे एकत्र लढवण्याचे ठरवले आहे. इथेही भाजपचे अंतिम उद्दिष्ट शिंदे व दादांना संपवणे हेच आहे. पण तरीही मैत्री चालू आहे. काँग्रेसने भाजपकडून हे शिकण्याची गरज आहे.

## राहुलचा पुढाकार हवा

बिहारमध्ये महागठबंधनमध्ये किमान बारा ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होणार आहेत. अशा लढती वगळून इतर जागांबाबत पुरेशा आधीच एकत्रित पत्रकार परिषदेत जोरदार घोषणा करण्याची गरज होती. प्रत्यक्षात या जागांवरची भांडणे चिघळत ठेवण्यात आली व आजतागायत महागठबंधनच्या जागावाटपाची अधिकृत घोषणा झालेली नाही. मिडियामध्ये त्यांच्याच बातम्या अधिक आल्या व वाईट प्रसिद्धी झाली. हे सर्व सहज टाळता येण्यासारखे होते. राज्यातील एकूण २४३ जागांपैकी गेल्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ १९ जागा मिळाल्या होत्या. इतके असूनही त्या पक्षाची मागण्या अवास्तव होत्या. अखेर लालूंच्या राजदने १४३ जागा लढत असल्याचे जाहीर केले. काँग्रेसला ६१ जागा मिळाल्या. डाव्यांना बाकीच्या जागा मिळाल्या. मात्र गेल्या वेळी डावे उमेदवार केवळ २००-४०० मतांनी हरले आहेत अशा जागाही आपल्यासाठी बळकावण्याचा काँग्रेसने प्रयत्न केला. हे आघाडीधर्मावर घाला घालणारे होते. बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान होईल. पहिले मतदान ६ नोव्हेंबरला आहे. म्हणजे आता प्रचारासाठी केवळ आठ-नऊ दिवस बाकी आहेत. पण राहुल गांधी बिहारमध्ये आलेलेच नाहीत. मध्यंतरी काँग्रेसच्या व्होट चोरी यात्रेचा फायदा तेजस्वींच्या राजदलाच होईल अशी आवई उठवण्यात आली. पण ते अपरिहार्य आहे. लालू यांच्या राजदने दिल्लीमध्ये काँग्रेसला एकनिष्ठपणे साथ दिली आहे. त्याची परतफेड या रीतीने झाली तर काही बिघडत नाही. किंबहुना, असे झाले तरच स्थानिक पक्षांना काँग्रेसविषयी अधिक भरवसा वाटू लागेल. पण काँग्रेसच्या दरबारी नेत्यांचा सरंजामी पीळ अजूनही गेलेला नाही. यापैकी बहुतेक जण दहा देखील मते मिळवण्याच्या लायकीचे नाहीत. पण काड्या घालणे वा राहुल यांचे कान भरणे यात ते अग्रेसर असतात. राहुल, प्रियांका व त्यांच्या शहाण्या सल्लागारांनी या लोकांना दूर करून वास्तवाचा उदार हृदयाने स्वीकार करायला हवा. तरच हा पक्ष दीर्घ काळात वाढू शकेल. तरच याला २०२९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिल्ली ताब्यात घेण्याची काही आशा बाळगता येऊ शकेल. व्होट चोरीसारखे विषय ऐरणीवर आणून राहुल यांनी मोठे काम केले आहे. भाजप व मोदींना कधी नाही ते बॅकफूटवर ढकलले आहे. पण याचे काँग्रेसच्या बाजूने मतांमध्ये परिवर्तन होण्यासाठी राहुल यांना आपल्या प्रचारात सातत्य ठेवावे लागेल. मध्येच गायब होऊन किंवा विषय सोडून देऊन चालणार नाही. शिवाय, त्या त्या प्रदेशातील संघटना बळकट करण्याकडेही जातीने लक्ष द्यावे लागेल. बिहारमध्ये अजूनही संधी गेलेली नाही.

विचार

# ईव्ही धोरणात बदलाची आवश्यकता

**मिलिंद बेंडाळे**

***भारताने व्यापक हेतूने ईव्ही वाहनांबाबत धोरण आखले. त्यासाठी निवडलेली कारणे योग्य आहेत; परंतु तेवढ्याच कारणांमुळे सर्वांना आवश्यक बदल घडवून आणता येत नाही. आपण आपल्या धोरणांमध्ये फेरबदल करायला हवा. आपण सध्या काय करत आहोत आणि का करत आहोत याचे मूल्यांकन करायला हवे. तेव्हाच आपण वाहन विद्युतीकरणाचा अजेंडा पुढे नेऊ शकतो आणि अत्यंत आवश्यक असलेले फायदेही मिळवू शकतो.***




कोणत्याही देशात वाहनांच्या ताफ्यांचे विद्युतीकरण करण्याची तीन मुख्य कारणे आहेत. पहिले म्हणजे हवामानबदल. वाहतूक क्षेत्र मोठ्या प्रमाणात तेल वापरते. म्हणजेच पेट्रोल आणि डिझेल आणि दर वर्षी जागतिक कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात अंदाजे १५ टक्के योगदान देते. शून्य-उत्सर्जन वाहने किंवा इलेक्ट्रिक वाहने, तेलाऐवजी वीज वापरतात. अक्षय ऊर्जा प्रकल्पांमध्ये ही वाहने निर्माण होतात, म्हणून त्यांच्याकडे प्रदूषण कमी करण्याचे साधन म्हणून पाहिले जाते. आपल्या शहरांसाठी दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे पेट्रोल आणि डिझेल वाहनांना शून्य-उत्सर्जन वाहनांनी बदलल्याने स्थानिक प्रदूषण कमी होईल आणि तिसरे कारण म्हणजे तेलाचा वापर कमी केल्याने आपले मौल्यवान परकीय चलन वाचेल. प्रथम आपल्या शहरांचा विचार करू या. तिथे वाहन विद्युतीकरण दुप्पट आणि तिप्पट फायदे आणू शकते. विषारी वायू प्रदूषण कमी करण्यात, परकीय चलन वाचवण्यात आणि हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते. हे सर्व चांगले असले, तरी आपण आपल्या धोरणांबद्दल स्पष्ट असतो आणि ते कोणत्या प्रमाणात करावे याबद्दल काळजीपूर्वक विचार करतो, तेव्हाच हे शक्य होते. २०१९ मध्ये नीती आयोगाने देशातील इलेक्ट्रिक वाहनांसाठीची आपली महत्त्वाकांक्षा मांडली. त्याचे उद्दिष्ट २०३० पर्यंत देशातील सर्व नवीन व्यावसायिक कारपैकी ७० टक्के, खासगी कारपैकी ३० टक्के, बसपैकी ४० टक्के आणि दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या ८० टक्के विक्रीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश असावा, असा प्रयत्न असणार आहे. मात्र २०२५ च्या मध्याजवळ पोहोचताना, आपण या लक्ष्यापासून खूप दूर आहोत.

आजघडीला तीनचाकी वाहनांचाच एकमेव विभाग वाढत आहे. त्यात जवळजवळ ६० टक्के नवीन नोंदणी इलेक्ट्रिक वाहनांची आहे. ही बहुतेक स्थानिक पातळीवर उत्पादित केलेली ब्रँडेड नसलेली तीनचाकी वाहने आहेत. ती रस्त्यावरील गर्दी वाढवतात, तरी भाड्याच्या बाबतीत किफायतशीर आहेत. उर्वरित इलेक्ट्रिक वाहनांच्या ताफ्यात होत असलेली प्रगती कमीच आहे. कार, दुचाकी आणि अगदी बसच्या नवीन नोंदणींमध्येही त्यांचा वाटा फक्त ५-६ टक्के आहे. यामुळे प्रदूषण कमी होण्यास, तेलाची आयात कमी होण्यास किंवा कार्बन उत्सर्जन कमी होण्यास काहीही मदत होत नाही. आपण श्वास घेत असलेल्या प्रदूषित हवेत वाहनांचा सर्वाधिक वाटा असतो, हे माहीत असूनही हे घडते. हे केवळ प्रदूषण उत्सर्जित करणाऱ्या वैयक्तिक वाहनांच्या श्रेणीबद्दल नाही, तर प्रदूषणात योगदान देणाऱ्या रस्त्यांवरील वाहनांच्या वाढत्या संख्येबद्दलही आहे. म्हणून, वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी आपण एकाच वेळी दोन्ही ध्येये साध्य केली पाहिजेत- स्वच्छ वाहने वापरणे आणि वाहनांची संख्या कमी करणे.

२००० च्या दशकाच्या सुरुवातीला दिल्लीमध्ये सीएनजी वाहनांचा वापर सुरू झाला, तेव्हा बस, टॅक्सी आणि ऑटोरिक्षासारखी प्रदूषण करणारी वाहने लक्षित होती. सार्वजनिक आणि व्यावसायिक वाहनांची ही श्रेणी कोणत्याही शहरात, विशेषतः दिल्लीमध्ये सर्वात लांब अंतर प्रवास करते. प्रदूषणाचे विज्ञान स्पष्ट आहे, अंतर जितके जास्त तितके उत्सर्जन जास्त. शिवाय, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी जुन्या वाहनांच्या जागी नवीन सीएनजी वाहने घेण्यासाठी सार्वजनिक अनुदाने देण्यात आली. त्यामुळे लोकांना गाडी चालवण्याऐवजी चालण्यासाठी जागा मोकळी झाली. तथापि, दिल्लीची गोष्ट चुकीची ठरली. ही एक धोरणात्मक चूक आहे, जी आपण पुन्हा करू नये; कारण ती स्वच्छ हवेचे फायदे नाकारते आणि सार्वजनिक गुंतवणूक वाया घालवते. सीएनजी क्रांतीच्या दोन दशकांनंतर दिल्ली आपल्या रस्त्यांवरील वाहनांच्या वाढीला आळा घालण्यासाठी सार्वजनिक वाहतूक पुरेशी सुधारण्यात अपयशी ठरली आहे. दिल्लीत दररोज अंदाजे १,८०० नवी खासगी वाहने रस्त्यावर येतात. त्यात पाचशेहून अधिक खासगी कार्सचा समावेश आहे, तर संपूर्ण देशात दररोज दहा हजारांहून अधिक खासगी कार रस्त्यावर येतात. नवनवीन उड्डाणपूल आणि रस्ते नेटवर्क असूनही आपल्या रस्त्यांवर होत असलेला वाहनांचा हा स्फोट म्हणजे आपण वाहतूक कोंडीत अडकत असून प्रवासाचा वेग कमी करत आहोत. 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'मधील तज्ज्ञांनी गुगल एपीआय वापरून तासाभराच्या प्रवासवेळेच्या डेटाचे विश्लेषण केले तेव्हा आढळले की आठवड्याच्या दिवशी दिल्लीमध्ये सकाळी गर्दीच्या वेळी सरासरी वेग ४१ टक्के तर संध्याकाळी गर्दीच्या वेळी ५६ टक्के कमी होतो. वाहतुकीत घालवलेला वेळ आणि वाढते वायू प्रदूषण यांच्यातील संबंध पूर्णपणे स्पष्ट आहे. दुसऱ्या एका अभ्यासात आढळून आले, की बस अशा वाहतूक कोंडीत अडकतात तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते. गर्दीमुळे होणाऱ्या विलंबामुळे लोक अधिक विश्वासार्ह वाहनांकडे वळतात. ते स्वतःच्या वाहनांचा वापर करायला लागतात. दिल्ली मेट्रोने आपला विस्तार लक्षणीयरीत्या वाढवला आहे; परंतु तिच्या कनेक्टिव्हिटीला मर्यादा आहेत. जास्त भाडे आणि इतर समस्यांमुळे ती मागे पडत आहे. म्हणून, पुढे जाण्याचा मार्ग म्हणजे आपल्या धोरणावर लक्ष केंद्रित करणे आणि त्यावर विचार करणे. टेस्ला किंवा बीवायडीसारख्या इलेक्ट्रिक कार कंपन्यांची वाहने आज आपण ज्या हवामान समस्येचा सामना करतो त्याचे उत्तर आहेत का, याचाही विचार करायला हवा. हा एक सोयीस्कर प्रश्न असला, तरी त्याचे उत्तर सोपे नाही.

जग हरितगृह वायू (जीएचजी) उत्सर्जन रोखण्यासाठी पावले उचलत असताना यावर चर्चा करणे महत्त्वाचे आहे. काही देश पुढे जात आहेत तर काही उलट्या दिशेने. या परिस्थितीत, आपण वेगाने हवामान आपत्तीच्या जवळ येत आहोत. खासगी कार स्वच्छ आणि कमी-उत्सर्जन करणाऱ्या 'ईव्ही' असल्या तरी त्यांना प्रोत्साहन देण्यात खरेच फायदा आहे का, याचा विचार केला पाहिजे. आपल्या अर्थव्यवस्था कार्बनमुक्त करण्याच्या दिशेने जलद गतीने पुढे जाण्याचा दबाव असलेले जुने औद्योगिक देश अंतर्गत ज्वलन इंजिन असलेल्या वाहनांना (कार आणि मोटार सायकलींमध्ये वापरल्या जाणाऱ्या इंजिनांना) पर्याय म्हणून 'ईव्ही' कार्यक्रमांचा विचार करत आहेत. या देशांना आशा आहे की इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब केल्याने 'डीएचजी' उत्सर्जन कमी होईल. उदाहरणार्थ, युरोपने २०३० पर्यंत ८० टक्के नवीन कार शून्य-उत्सर्जन वाहने असण्याचा आदेश दिला होता. तो २०३५ पर्यंत शंभर टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य होते. अमेरिकेने २०३० पर्यंत ५० टक्के नवीन वाहन नोंदणी इलेक्ट्रिक वाहनांची असेल, असे लक्ष्य ठेवले होते. या देशांमध्ये वाहतूक क्षेत्राला कार्बनमुक्त करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणे, हे प्राथमिक उद्दिष्ट आहे आणि हे केवळ आयसी इंजिन टप्प्याटप्प्याने बंद करूनच शक्य आहे.

युरोपमध्ये गेल्या तीन दशकांमध्ये वाहतूक क्षेत्रातून हरितगृह वायूउत्सर्जन वाढले आहे. युरोपमध्ये रस्ते वाहतूक उत्सर्जनात खासगी कारचा वाटा ६० टक्के आहे. म्हणूनच, हे क्षेत्र कार्बनमुक्त करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे; परंतु युरोपला आता ऑटोमोटिव्ह पुरवठा साखळीच्या भू-राजकीय क्षेत्रातील सर्वात मोठा खेळाडू असलेल्या चीनकडून आव्हानाचा सामना करावा लागत आहे. याव्यतिरिक्त, खासगी वाहतुकीसाठी रस्ते, उड्डाणपूल आणि इतर पायाभूत सुविधा बांधण्याचा प्रचंड खर्च खासगी कार मालकांसाठी मोठ्या प्रमाणात अनुदानासारखा आहे. म्हणूनच कार्बनीकरण कमी करण्याचे आणि वायू प्रदूषण कमी करण्याचे उद्दिष्ट मागणी करते, की आपण आपल्या रस्त्यांवरील खासगी वाहतूक कमी करावी आणि वाहनांवर नव्हे, तर लोकांना हलवण्यावर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन स्वीकारावा.

# शेतकऱ्यांच्या स्वप्नांची माती

**राकेश लोहार**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून परतीच्या पावसाने मुसळधार कोसळून काढणीसाठी आलेल्या भातपिकाचे नुकसान केले आहे. वादळीवाऱ्यामुळे भातपीक शेतातच जमीनदोस्त झाले आहे. त्या पिकावरुन पाण्याचे लोट जात असल्याने कष्टाने पिकवलेल्या शेतीची माती झाली आहे. पिके पाण्याखाली राहिल्याने त्यांना कोंब येऊ लागलेत. त्यामुळे ती कुजून जाण्याची भीती आहे. चार महिन्यांचा पावसाळा आज सहा महिन्यांवर गेलाय आणि अजून किती पाऊस कोसळेल याचीसुद्धा शाश्वती नाही. त्यामुळे शेतकऱ्याची धाकधूक आणखीनच वाढली आहे. जिद्द आणि मेहनतीने काळ्या मातीतून सोनं पिकविण्याची हिंमत बाळगणारा आमचा शेतकरी आज पुरता चिंतेने व्याकूळ झाला आहे. वर्षानुवर्षे निसर्गाशी तितक्याच ताकदीने तोंड देणारा माझा बळीराजा आज त्याच्यापुढे हतबल झाला आहे.

यंदाचा पाऊस स्वप्नांची माती करणारा ठरला, असंच म्हणावं लागेल. कारण, सुरुवातीपासूनच यंदा पावसाने शेतकऱ्याला दगा दिला. परंतु, त्यातूनही हार न मानता शेतकऱ्यांनी शेती केली, पिकेही जोमात होती. पिकांची कापणी होऊन दिवाळी गोड होईल, या आशेवर असणारा शेतकरी परतीच्या पावसामुळे पुरता कोलमडून पडला आहे. पिकांची दुर्दशा झाली आहे. दोन पैसे हाती मिळतील ही आशा होती. मात्र, पिकांची दुर्दशा झाल्याने ती मावळली आहे, अशी भयावह स्थिती आहे. परतीचा पाऊस शेतकऱ्यांसाठी उद्ध्वस्त करणारा ठरला आहे. जे शिवार पिवळ्या धम्मक सोन्यानं (भातपिकानं) भरावं, तेच शिवार आज पाण्याने भरले आहे.


गरिबी आणि दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्याला अस्मानीच्या संकटाने पुरते उद्ध्वस्त केले आहे. पदरमोड, उसनवारी करुन कष्टाने केलेल्या शेतीत आता काहीच राहिलेले नाही. पावसाने काहीच ठेवलं नाही. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने दिवाळीचा सण असून नसल्यासारखाच साजरा केला, या वेदना माझ्या शेतकऱ्यांच्या आहेत. सातत्याने पाऊस पडत असल्याने आजची परिस्थिती अशी आहे की, काही ठिकाणी आडव्या पडलेल्या भातपिकाला कोंब फुटले आहेत. एकेकाळी आकाशाकडे नजर लावून पावसाची वाट पाहणारा शेतकरी आता पावसामुळेच अडचणीत सापडला आहे. भातपीक खराब झाल्याने पैसा होणार नाही आणि जनावरांना चारादेखील उरणार नाही, अशी परिस्थिती आहे. रायगड जिल्ह्यावरच नव्हे, तर संपूर्ण राज्यावर ओल्या दुष्काळाचं संकट आहे.

दुष्काळ ओला असो वा सुका, तो शेतकऱ्याला आयुष्यातून उठवतो. शेतीवर जगणाऱ्याला त्याचे चटके बसतातच. हानीचा मोबदला पैशांत मोजला जाऊ शकत नाही. परंतु, त्याशिवाय गत्यंतर नसतं. शासन स्तरावरुन सरसकट मदतीची घोषणा झाली खरी; मात्र, 'ओला दुष्काळ' नव्हे, तर 'त्यासारखं' साह्य करण्याचं जाहीर झालं. ओलं संकट यापेक्षा वेगळं म्हणायचं काय? शेवटी घोषणा म्हणजे लबाडाघरचं आवतण. नियम-निकषांची जंत्रीही हळूच पुढे येईलच! पावसानं शेती वा शेतीतील पीकच नव्हे, तर शेतकऱ्याचं जगणंच ओरबाडलं. ज्याच्यावर सर्वाधिक भरवसा होता, त्या सख्यानंच (वरुणराजानं) पुन्हा एकवार त्याला नाडलं. पावसाबरोबरच फक्त पिकंच नव्हे तर, बळीराजाची स्वप्नंही कुजली आहेत. पावसानं जे काही नुकसान केलेय, भरुन येणार तरी कसं? शासनाकडून मिळणाऱ्या तोकड्या मेहतनीतून काही होणार आहे का? आणि, ती मदत मिळणाऱ्यासाठी सतराशे साठ नियम आणि अटीसुद्धा. एवढं दिव्य पार करताना शेतकरी हैराण होतो, आणि नको ती मेहनत, या निणर्यासमीप पोहोचतो. त्यामुळे शेतकऱ्याला सरसकट मदत करणे, शासनकर्त्यांनी जाहीर करावे, तेवढाच दिलासा मिळेल. संकटातून सावरायला त्याला बळ मिळेल.

शेतकऱ्यावर आलेल्या संकटात कवी कुसुमाग्रजांच्या 'कणा' या कवितेची आठवण होते. 'पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा' असं ते सांगून गेले; पण आता शेतातील मेहनत आणि कष्ट खूप आहेत. त्यासाठी शेतकरी निसर्गात निर्माण होणाऱ्या संकटांशी दोन हात करुन लढत कष्ट करीत असतो. परंतु, लढता-लढता त्याची ताकदही आता कमी पडू लागली आहे की काय, संकटं त्याच्या पाचवीला पुजल्यासारखी एकामागून एक येत आहेत. त्यामुळेच केवळ 'लढ' म्हणण्याचे वा पोकळ बाता करण्याचे दिवस सरलेत. शेतीवर गुजराण करणाऱ्यांना आधीच नागवलं गेले असल्याने पाठीवर हात ठेवतानाच, दुसऱ्या हातानं मदतही द्यावीच लागेल. ती आर्थिक स्वरुपात चांगल्या प्रकारे मिळणे, आवश्यक आहे. त्यामुळे मायबाप शासनकर्त्यांना निकषांचे अडसर सैल करावे लागतील. संकटाच्या माऱ्यानं पिचलेल्या शेतकऱ्याच्या पंखांना बळ द्यायचे असेल, तर त्यांना वेळेवर मदतीसाठी त्याच्या बांधावर गेलेच पाहिजे. त्यासाठी शासनकर्त्यांसह तुम्हा-आम्हालाही दातृत्वाची 'पणती' तेवावी लागेल. फूल ना फुलाची पाकळीप्रमाणे जुळवाजुळव करावी लागेल. आपल्या गावासाठी, गावकऱ्यांसाठी आपल्या बळीराजासाठी जमेल तसं, शक्य तितकं रितं व्हावं लागेल. सामाजिक बांधिलकीचं भान दाखवत दातृत्वाचे पूर निघतील, तेव्हा नुकसानग्रस्त बळीराजाच्या वेदनेवर खऱ्या अर्थाने मायेची फुंकर घालण्यात आपण यशस्वी होऊ. अर्थव्यवस्थेचा कणा समजली जाणारी शेती वाचवायची असेल, तर सर्वात आधी शेतकऱ्याला वाचवावं लागेल. त्यासाठी हातावर हात ठेवून नाही, शेतकऱ्याला मदतीचा हात द्यावा लागेल.

लोकसंसद

## छठपूजा : श्रद्धा की मतांचं राजकारण?



तीस वर्षांपूर्वी माफक प्रमाणात मुंबईच्या जुहू किनाऱ्यावर सुरू झालेली छठपूजा हल्ली मोठ्या प्रमाणावर साजरी होतेय. उत्तर भारतीयांची ही धार्मिक परंपरा असली, तरी तिचं आजचं वाढलेलं स्वरूप केवळ श्रद्धेमुळे नाही, तर राजकीय गणितामुळे आहे. मुंबईतील परप्रांतीयांची वाढती लोकसंख्या ही आज महत्त्वाची मतपेढी बनली आहे. या मतांवर डोळा ठेवूनच प्रत्येक पक्षाने छठपूजेला केंद्रस्थानी आणलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार निवडणुकीच्या प्रचारावेळी ''बिहारी बांधवांनी छठपूजेसाठी मुंबईत या'' असं निमंत्रण देणं, तसेच अलीकडे भाजप नेत्यांकडून महापालिका अधिकाऱ्यांना सुविधांबाबत दिलेली तंबी, इतर राजकीय पक्षांनी छठपूजेनिमित्त मोठमोठाले फलक लावणेः इत्यादी गोष्टी मतपेढीच्या राजकारणाचाच मुद्दा अधोरेखित करतात. गणेश विसर्जनावेळी जलप्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात आले; छठपूजेसाठीही तसेच पर्यावरणपूरक नियोजन काटेकोरपणे करायला हवे. समुद्रकिनाऱ्यांवर पूजा होताना फुलं, कपडे, प्लास्टिक यामुळे निर्माण होणारं प्रदूषण ही गंभीर समस्या आहे. धार्मिक श्रद्धेला विरोध नाही, पण मतांसाठी श्रद्धेचे उत्सवीकरण आणि प्रदूषणाकडे दुर्लक्ष हे शहराच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. श्रद्धा आणि पर्यावरण यांचं संतुलन राखणं हेच खऱ्या अर्थाने जबाबदार प्रशासनाचं काम ठरावं.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# तारापूर अणुऊर्जा प्रकल्प सुरू झाला

वीजनिर्मिती क्षेत्रात देशात अणुऊर्जेचा स्रोत खुला करणारा 'तारापूर अणुऊर्जा प्रकल्प' कार्यक्षमतेने सुरू असून आणखी काही वर्षे तो किफायतशीर वीजनिर्मिती आणि वितरणाचा मुख्य स्रोत ठरणार आहे. २८ ऑक्टोबर १९६९ या दिवशी या केंद्रातून व्यावसायिक तत्त्वावर वीजउत्पादन सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर अवघ्या सात महिन्यात म्हणजे २३ मार्च १९४८ रोजी तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी संसदेत अणुऊर्जा विधेयक मांडले आणि ते संमत झाले. त्यायोगे अणुऊर्जा संशोधन आणि प्रकल्प उभारणीचे सर्वाधिकार केंद्र सरकारकडे एकवटले. त्यांच्याच कारकिर्दीत या पहिल्या अणुऊर्जा प्रकल्पाचा करार झाला. लालबहादूर शास्त्री यांच्या कारकिर्दीत त्याची उभारणी सुरू झाली आणि इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत १९६९ मध्ये या केंद्रातून व्यावसायिक तत्त्वावर वीजउत्पादन सुरू झाले आणि एप्रिल १९७०मध्ये तो पूर्ण क्षमतेने ४२० मेगावॉट विजेचे उत्पादन करू लागला. १९७४पासून या प्रकल्पाचे तांत्रिक साह्य परदेशी कंपन्यांनी थांबवल्यानंतर देशातील शास्त्रज्ञांनीच या प्रकल्पाची आणि त्यासाठीच्या संशोधनाची धुरा समर्थपणे वाहिली. त्यामुळे हा प्रकल्प म्हणजे राजकीय इच्छाशक्ती आणि शास्त्रज्ञांची जिद्द या दोन्हींचा अनोखा संगम अधोरेखित करणारा ठरला आहे.

मे १९६४ मध्ये अमेरिकेतील जनरल इलेक्ट्रिक कंपनीबरोबर 'तारापूर ॲटॉमिक पॉवर स्टेशन' अर्थात 'टॅप्स' उभारणीबाबत करारनामा झाला. त्यानंतर ऑक्टोबर १९६४ मध्ये या केंद्राची उभारणी सुरू झाली. त्या काळी दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने बैलगाडीतून या प्रकल्पातील अनेक उपकरणे प्रकल्पाच्या ठिकाणी नेण्यात आली होती! एप्रिल १९७० मध्ये हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने वीज उत्पादन करू लागला. युरेनियम २३५ या अधिक शुद्ध प्रतीच्या युरेनियमच्या माध्यमातून बॉयलिंग वॉटर रिॲक्टर (बीडब्ल्यूआर) या पद्धतीच्या दोन अणुभट्ट्या हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्ये होते. सोविएत युनियनव्यतिरिक्त आशिया खंडातील अशा अणुभट्ट्या केवळ तारापूर येथेच होत्या.

१९७४ साली या प्रकल्पाला परदेशी कंपन्यांकडून मिळणारे तांत्रिक साहाय्य बंद झाले. त्यानंतर देशातील शास्त्रज्ञ आणि स्वदेशी कंपन्यांच्या मदतीने या प्रकल्पाची वाटचाल सुरूच राहिली. भाभा अणू संशोधन केंद्र (बीएआरसी) यांच्याकडून इंधन व्यवस्थापन आणि विकसन, सुटे भाग उत्पादित करण्यास मार्गदर्शन, तसेच तांत्रिक मार्गदर्शन आदी जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या गेल्या. त्यामुळे देशातील या पहिल्या अणुऊर्जा प्रकल्पाची भरभराट होत राहिली. या केंद्राद्वारे ८०-९५ पैसे प्रति युनिट इतक्या कमी दराने वीज उत्पादन होत असून महाराष्ट्र आणि गुजरातला वीजपुरवठा केला जातो.

वीज उत्पादन व्यवस्थेतील दुय्यम बाष्पजनित्रामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने प्रारंभी २१० मेगावॉट क्षमतेच्या या प्रकल्पाची क्षमता १६० मेगावॉटपर्यंत कमी करण्यात आली. समृद्ध युरेनियम पुरवठ्यावर जागतिक पातळीवर निर्बंध आल्यानंतर देशातील शास्त्रज्ञांनी मिश्र ऑक्साइड इंधन विकसित करून त्याद्वारे या अणुभट्ट्यांतील वीजनिर्मिती सुरूच ठेवली.

इंधन पुरवठ्याविषयीचा १९६०चा करारनामा आणि त्यावेळचे भट्टीबांधणी तंत्र पाहता हा प्रकल्प २५ वर्षे म्हणजे १९९४पर्यंतच कार्यरत राहू शकेल, असा प्रारंभिक अंदाज होता. त्यामुळे १९९३मध्ये या प्रकल्पाचा सुरक्षेच्या अंगाने तसेच ऊर्जानिर्मितीच्या दृष्टीने सखोल तांत्रिक आढावा घेण्यात आला. त्या आढाव्यानुसार १९९५मध्ये या दोन्ही अणुभट्ट्यांचे आवश्यक ते नूतनीकरण, दुरुस्ती आणि पर्यायी बदल करून त्या अधिक सक्षम केल्या गेल्या. त्यामुळे त्यांचा कार्यकाळही आपसूक वाढला. तसेच आणखी काही वर्षे या अणुभट्ट्या सक्षमतेने कार्यरत राहतील, असेही आढाव्यातून स्पष्ट झाले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ ऑक्टोबर

१) श्रीम. शैलजा धुंडिराज लेले अलिबाग, २८-१०-१९३६
२) श्री. गजानन विनायक जोशी चेंढरे, अलिबाग, २८-१०-१९६१
३) श्री. संतोष रामकृष्ण वाकडे नागडोंगरी, अलिबाग, २८-१०-१९६०
४) श्रीम. शिल्पा सिताराम नाईक चेंढरे, अलिबाग, २८-१०-१९६४

## होमगार्डनी वाचवला प्रवाशाचा जीव

**खेड :** खेड रेल्वे स्थानकावर बंदोबस्तासाठी असताना होमगार्ड जवानांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे एका प्रवाशाचा जीव वाचला आहे. मडगाव-एलटीटी हॉलिडे स्पेशल एक्स्प्रेस ट्रेनमध्ये चढत असताना एका प्रवाशाचा पाय घसरला. तो ट्रेनखाली जाण्याच्या अवस्थेत असतानाच खेड होमगार्ड पथकाचे चव्हाण, सुर्वे, मोरे, दुर्गवळे, वैकर यांनी जीवाची पर्वा न करता तत्काळ धाव घेत प्रवाशाला ओढून बाहेर काढले.

# मुंबईचा घातक कचरा उरण-पनवेलमध्ये

### ।। परिसरातील नागरिकांना धोक्याची घंटा ।। वाहनचालकांचे जीव मुठीत धरून मार्गक्रमण

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुंबई शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा दुर्गंधीयुक्त घातक कचरा आणि डेब्रिज उरण-पनवेल परिसरातील खासगी, सिडकोच्या जागांवर बेकायदेशीरपणे टाकला जात असल्याचा गंभीर प्रकार उरणमध्ये सर्रास सुरू आहे. हा कचरा केवळ दुर्गंधी आणि पर्यावरणाचे प्रदूषण करत नाही, तर थेट परिसरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे. या कचऱ्यात केवळ प्लास्टिक आणि सामान्य घाण नसून, मृत पशुपक्षी, प्राण्यांचे अवयव आणि गटारातील घाणही मोठ्या प्रमाणात मिसळलेली असते. यामुळे परिसरात जीवघेणी दुर्गंधी पसरत आहे. मुंबईतील इमारतींचे डेब्रिजही या कचऱ्यासोबत अवजड डंपर्सद्वारे दररोज आणले जाते. काही व्यावसायीक कमी पैशात मिळालेल्या या कचरा-डेब्रिजचा उपयोग खासगी जागांवर भराव करण्यासाठी करत आहेत. उरण परिसरातील चिरनेर, जासई, चिरले, वेश्वी, गव्हाण फाटा, दिघोडे, जुई, खोपटा, कोप्रोली रस्त्यांवर



तसेच उलवे नोड परिसरातील सिडको आणि वनखात्याच्या जागांवर हा कचरा बिनदिक्कतपणे टाकला जात आहे.

यामुळे परिसरातील नागरिक आणि रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना नाक मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. या कचर्यामुळे परिसरातील वायू प्रदूषणात मोठी भर पडली आहे, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. श्वसनाचे आजार वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. दररोज येणाऱ्या हजारो टन कचरा आणि डेब्रिजमुळे उरण-पनवेल, गव्हाण मार्गाच्या बाजूला असणाऱ्या शासकीय जागांवर आता कचऱ्याचे मोठे डोंगरच तयार झाले आहेत.

कमी पैशात मिळणाऱ्या या डेब्रिजचा वापर करून खाजगी जागांवर भराव केला जात आहे. मात्र, डेब्रिज भरावासाठी शासनाचे नियम आणि स्वामित्व धन भरणे बंधनकारक असताना, या बेकायदेशीर कृत्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडाला जात आहे. डेब्रिजचा वापर करून अवैध भराव करणाऱ्यांकडून शासनाची मोठ्या प्रमाणात आर्थीक फसवणूक होत आहे. या सर्व गंभीर प्रकाराकडे संबंधित शासकीय अधिकार्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

यापूर्वी प्रांताधिकाऱ्यांनी डेब्रिज टाकणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, मात्र ही कारवाई केवळ कागदावरच राहिली. पर्यावरणाचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत असतानाही, शासकीय यंत्रणांकडे अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याने परिसरातील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या बेकायदेशीर कचरा डंपिंगमुळे पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत असून, शासकीय अधिकार्यांच्या दुर्लक्षामुळेच हे व्यावसायीक मोकाटपणे काम करत आहेत. बेकायदेशीर कचरा डेब्रिज टाकणाऱ्या व्यवसायिकांवर आणि याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. हा कचरा बेकायदेशीरपणे टाकण्यामागे केवळ साधे वाहतूकदार नसून, संघटित कचरा माफियाचे एक मोठे रॅकेट कार्यरत आहे. हे माफिया मुंबईतील कचरा कमी दरात उचलतात आणि उरण-पनवेल भागात बेकायदेशीरपणे डंप करून लाखोंची कमाई करतात. या माफियांचे जाळे वाहतूकदार, जागेचे दलाल आणि काही स्थानिक हातमिळवणी करणाऱ्या व्यक्तींपर्यंत पसरलेले आहे. कमी पैशात जागा भराव करण्यासाठी उपलब्ध होत असल्याने, डेव्हलपर्स आणि खासगी जमीन मालक देखील या माफियांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन देत आहेत. अनेक ठिकाणी हा डेब्रिज आणि कचरा खाडीकिनारी असलेल्या खारफुटीच्या वनांमध्ये आणि पाणथळ जागांमध्ये टाकला जात आहे. खारफुटी नष्ट झाल्यामुळे परिसरातील पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. हे खारफुटीचे वनक्षेत्र पूर नियंत्रण आणि नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते, जे आता धोक्यात आले आहे.

### साथीच्या रोगांचा धोका

*डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस आणि इतर गंभीर साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे. सततच्या वायू प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, अस्थमा आणि त्वचेचे आजार नागरिकांमध्ये वाढत आहेत, जे दीर्घकाळात गंभीर समस्या निर्माण करतील.*



## चाकरमान्यांना लेट मार्क

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

पुणे मार्गावरून धावणाऱ्या जालना आणि सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसमुळे कर्जत लोकलला मोठा थांबा मिळत असल्याने चाकरमान्यांना लेट मार्क लागत आहे. वंदे भारत या गाड्या नॉन स्टॉप धावत असल्याने बाकीच्या गाड्या थांबविल्या जातात. यामुळे या गाड्यांना १५ ते २० मिनिटांचा लेट मार्क लागत आहे. कर्जत-खोपोली रेल्वे मार्गावर ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीच्या काही दिवसांपासून कर्जत रेल्वे स्थानकातून अप मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मात्र हाल झाल्याचे दिसून येतात. प्रामुख्याने हे काम सुरू असल्याने वंदे भारतसारख्या एक्स्प्रेस गाड्या लोकल ट्रॅकवरून धावत असल्याने लोकल गाड्यांना २० ते ३० मिनिटांचा सिग्नल मिळू लागला आहे. रेल्वे परिणामी लोकलच्या नियमित होणाऱ्या रहदारीला रेल्वे प्रशासनाकडून मोठा थांबा देण्यात येतो. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना लेट मार्क बसत आहे.

# कोकणात जाण्याचा मार्ग खडतर

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई - गोवा महामार्गाचे काम अद्यापही ३० टक्के बाकी असून, मार्गावर आजही खड्डे असल्याने पर्यटकांसह स्थानिकांना गचके खातच प्रवास करावा लागला. हा महामार्ग पूर्ण होणार तरी कधी असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. मुंबई-गोवा महामार्गा वरील चौपदरीकरणाचे काम अजूनही बाकी असणारे ओव्हरब्रिज, सर्व्हिस रोड हे पाहता पुन्हा पुढील वर्षही महामार्गाची रडकथा सुरूच राहील, असे चित्र दिसत आहे. महामार्गाचे अजून ३० टक्के काम बाकी आहे. गणेशोत्सवातही याच खड्ड्यातून प्रवास करणाऱ्यांनी खड्ड्यातून येजा करत सरकारच्या नावाने उद्धार केला. यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीची गंभीर



समस्या उभी राहिली.दिवाळी संपताच सुट्टीची मजा लुटण्यासाठी लाखो पर्यटक रायगडात येऊ लागलेले आहेत. मात्र, रस्तेच चांगले नसल्याने त्यांचा प्रवासही खडतर होताना दिसत आहेत. यावर ठोस उपाययोजनांची गरज निर्माण झालेली आहे.

इंदापूर ते माणगाव या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी दररोज होत असते. यासाठी बायपास मार्ग संपादन करण्यात आले. मात्र या कामाला अजून सुरुवातही झाली नाही. महामार्गावर मधोमध अजूनही ८० टक्के वृक्ष लागवड केलेली नाही. यामुळे महामार्गावर प्रवास करताना कुठेही सावली आढळून येत नाही. २०२६ उजाडल्यानंतरही पुढील सात-आठ महिने ही कामे चालूच राहतील, सर्विस रोड, ओवर ब्रिज काम पूर्ण होण्यास अजून सहा सात महिने लागणार हे निश्चित आहे, त्यामुळे महामार्गाची अवस्था सध्या तरी खड्डयातूनच जाणारी असेल असे चित्र दिसत आहे.

महामार्गावर पथदिवे यांचे खांब लावण्यात आले आहेत, मात्र हे पथदिवे अजून सुरू झालेले नाहीत तर काही ठिकाणी पथदिव्यांचे खांब सुद्धा लावलेले नाहीत त्यामुळे रात्रीच्या वेळेस प्रवास करताना स्वतः च्या गाडीच्या उजेडावरच प्रवास करावा लागतो यातून अनेकदा अपघात घडलेले आहेत.

# हर्णे बंदरात मासळीची लाखोंची उलाढाल

**। दापोली । प्रतिनिधी ।**

हर्णे बंदरात गेल्या तीन दिवसांपासून सकाळी व संध्याकाळी पर्यटकांची रेकॉर्डब्रेक गर्दी पाहायला मिळत आहे. बंदराला जत्रेसारखे गजबजून गेले होते. पर्यटकांच्या मासळी खरेदीतून दररोज लाखोंची उलाढाल होत असून मच्छिमार महिलांना चांगला फायदा मिळत आहे. हर्णे बंदर हे दापोली तालुक्यातील सर्वात मोठे मासळी केंद्र आहे. या परिसरातील



चिमणी बाजार हे पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरत असून ताज्या मासळीच्या लिलावात सहभागी होण्याचा वेगळाच अनुभव पर्यटक घेत आहेत. कोळंबी, सुरमई, पापलेट, बांगडा, म्हाकुळ, बेबी म्हाकुळ, बग्गा आदी जातींना मोठी मागणी आहे. लिलावातील बोली लावताना पर्यटकांना सीफूड मार्केटचा अनोखा अनुभव मिळत आहे. सध्या बंदरामध्ये म्हाकूल - ३५० रु किलो ; पापलेट - ८००रु किलो;सुरमई - ६०० रु किलो, कोळंबी (जाडी) - ३०० रु किलो; बांगडा - १०० रु किलो;सरगा - ३५० असे दर आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये मासळीची आवकही मुबलक झाल्याने खवय्यांची चांगलीच चंगळ उडाली आहे.

## किनारपट्टी भागात वादळी पाऊस

**मळगाव :** अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे किनारपट्टी भागात अवकाळी पाऊस कोसळत असून वेगवान वारे वाहत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमुळे अरबी समुद्र खवळला असून किनाऱ्यावर मोठमोठ्या लाटा आदळत आहेत. बंदर विभागानेही धोक्याचा इशारा देण-ारा लाल बावटा वेंगुर्ले बंदरावर लावला आहे. या पार्श्वभूमीवर मच्छीमारांनी आपल्या नौका खाडी पात्रात नांगरून ठेवल्या आहेत. वेंगुले तालुक्यात गेले काही दिवस अवकाळी पावसाची संततधार सुरू असल्यामुळे नदी-नाल्यांना पाणी आले आहे. पावसाच्या पाण्याखाली भात शेती गेल्याने ती कुजण्याचा धोका आहे. तसेच पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. समुद्राच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाली असून समुद्रात मोठमोठ्या लाटा उसळत आहेत.

## उरलेले पीक वाचवण्यासाठी लगबग

**। खोडाळा । प्रतिनिधी ।**

दिवाळी सणानंतर खरीप पिकाची काढणी सुरू असतानाच मोखाडा तालुक्यात मुसळधार पावसाने गडगडाट करत तुंबळधार लावली होती. त्यामुळे मोखाडा तालुक्यातील भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पाण्यानी भरलेल्या खाचरातील पिके सडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अचानकपणे विजेच्या कडकडाटासह येणाऱ्या पावसाने भात पिकांची वाट लावली असून बळीराजा हवालदिल झाला आहे. सलग सहा महिने झालेल्या पावसामुळे आधीच खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. आता उरलेले पीक वाचवण्यासाठी शेतकरी लगबगीने कापणी करीत आहे. विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटात झालेल्या या पावसाने शेतात कापून ठेवलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात कापून ठेवलेले पीक वाया जाण्याच्या भीतीने तालुक्यातील शेतकरी हवालदिल झालेले आहेत.

# गणपतीपुळे किनाऱ्यावर दुर्घटनांचे सावट

**। गणपतीपुळे । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या गणपतीपुळे येथे गेल्या चार दिवसांपासून समुद्रात बुडणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे. सध्या गणपतीपुळे किनाऱ्यावर जयगड पोलीस ठाण्याच्या वतीने मोठी पोलीस गस्त वाढविण्यात आली आहे. त्यांच्या जोडीला जीवरक्षक व स्थानिक व्यावसायिक मोठी मेहनत घेत आहेत. किनाऱ्यावर वाढलेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर



पर्यटकांना सूचना देण्याचे काम सर्वच यंत्रणांकडून होत आहेत. याबाबत गणपतीपुळे देवस्थान समिती आणि गणपतीपुळे पोलीस यंत्रणेकडून खास पर्यटकांना समुद्राच्या धोक्याबाबत ध्वनिक्षेपकावरून सूचना दिल्या जात आहेत. एकूणच गेल्या चार दिवसांत बुडणाऱ्या पर्यटकांच्या घटनेला पर्यटकांचा अतिउत्साह, बेजबाबदारपणा आणि हलगर्जीपणा जबाबदार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. स्थानिक व्यावसायिकांच्या जीवरक्षक व पोलिसांच्या सूचनाकडे पर्यटकांचे दुर्लक्ष होत असल्याने सध्या या घटना घडू लागल्या आहेत.

### सततच्या संकटामुळे बळीराजा त्रस्त | निसर्गाच्या अवकृपेचा दरवर्षी फटका

# शेतकऱ्यांना अवकाळीचा पुन्हा तडाखा

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्ह्यात रविवारी (दि.२६) पुन्हा अवकाळी पाऊस झाला. गेल्या अनेक दिवसांपासून ठाणे शहरासह, भिवंडी, शहापूरच्या ग्रामीण भागाला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. रविवारी देखील ठिकठिकाणी मुसळधार पाऊस झाला. दरम्यान मागील आठवड्याभरापासून होणारा मुसळधार अवकाळी पाऊस, सोसाट्याचा वारा आणि विजांचा कडकडाटमुळे बळीराजा पुरता संकटात सापडला आहे. दिवसभराच्या लाहीनंतर शनिवारी सायंकाळी अवकाळी पावसाने पुन्हा एकदा शहापूर तालुक्यासह ग्रामीण भागाला तडाखा दिला. पिकांचे अतोनात नुकसान,



झाल्यामुळे बळीराजा उद्ध्वस्त झाला आहे. उभी पिके आडवी झाली आहेत. राब राब राबून काळ्या मातीत पिकवलले सोने शेतातच मातीमोल होण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असून हातातोंडाशी आलेला घासही हिरावला गेल्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे. सततच्या पावसामुळे शेतातील उभी पिके आडवी तर झालीच आहेत, परंतु पाण्याखाली जाऊन कुजली आहेत. अनेक ठिकाणी भात पिकांना मोड आल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीचे संकट ओढवण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भातशेतीची लागवड केली जाते. भात पीक हेच येथील शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन असून खरिप हंगामातील या पिकाला दरवर्षी निसर्गाच्या अवकृपेचा फटका बसत आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीपासून सुरू झालेला पाऊस अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. सणासुदीत अवकाळी पावसाने शहापूर तालुक्यातील भातपिकांना झोडपून काढल्याने ऐन दिवाळीत बळीराजाचे दिवाळे निघाले आहे. कष्ट करून काळ्या मातीत पिकवलेले सोन्यासारखे भात पीक कापण्याआधीच संकटात आले होते. त्यातच शनिवारी सायंकाळी शहापूर तालुक्यासह शेणवा, किन्हवली, डोळखांब, कसारा, खर्डी, चोंढे, साकडबाव आधी ग्रामीण भागात झालेल्या अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. शहापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे ३३ टक्केच्या वर नुकसान झालेली भात पिके व शेतजमिनीच्या नुकसानीचा अहवाल शासनाकडे पाठवला असून ११९७५ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

### शासनाकडून तुटपुंजी मदत

*सप्टेंबर महिना अखेरीस अनेक जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्यात आला. ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाचे पीक असलेल्या भातालाही काही अंशी अतिवृष्टीचा फटका बसला. त्या अनुषंगाने शहापुरात नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. मात्र नुकसानीच्या बदल्यात शासनाकडून प्रति गुंठा ८५ रुपयाप्रमाणे तुटपुंजी नुकसान भरपाई दिल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.*

## निवडक

### झाड कोसळून महावितरणचे नुकसान

**मालवण :** सुट्टीचा हंगाम सुरू असतानाच शनिवारी चिवला बीच परिसरात वादळी वाऱ्याने माड थेट वीज वाहिन्यांवर पडल्याने महावितरणचे मोठे नुकसान झाले. या घटनेमुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. सुट्यांमुळे चिवला बीचवर पर्यटकांची संख्या मोठी आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने स्थानिकांसह पर्यटकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, माजी बांधकाम सभापती खोत यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला. स्थानिकांच्या मदतीने युद्धपातळीवर वीजवाहिन्या दुरुस्त करण्याचे काम हाती घेतले. त्यांच्या या तत्परतेमुळे अल्पावधीतच वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यश आले. यामुळे पर्यटकांची होणारी गैरसोय आणि स्थानिकांचे संभाव्य नुकसान टळले. यावेळी खोत यांना परिसरातील मनोज शिरोडकर, रुपेश कांबळी, गणेश चिंदरकर, मनोज मयेकर, प्रदीप मयेकर, सर्वेश बागवे, राज कांदळकर आदींनी मदतकार्य केले.

### आंदुर्लेत 'कला महोत्सव' उत्साहात

**कुडाळ :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत आंदुर्ले आयोजित कला महोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात व जल्लोषात ग्रामदेवता श्री देवी आंदुर्लाई मंदिर येथे पार पडला. या कला महोत्सवात गावातील बालकांपासून ज्येष्ठांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याचे काम आंदुर्ले ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आले. यामध्ये पर्यावरणपूरक आकाशकंदील स्पर्धा, टाकाऊ वस्तूंपासून हस्तकला स्पर्धा, जुन्या साड्यांपासून कापडी पिशव्या बनविणे स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पुरुष व महिलांची पाककला स्पर्धा, लहान मुलांची वेशभूषा स्पर्धा, सुदृढ वासरू स्पर्धा, सुदृढ बालक स्पर्धा, खेळ पैठणीचा अशा प्रकारच्या सर्व स्पर्धांनी हा कला महोत्सव लक्षवेधी ठरला. रणजित देसाई, प्रफुल्ल वालावलकर यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले. निवृत्त आरोग्य सेविका रेखा काळसेकर, निवृत्त शिक्षिका मृणाली सर्वेकर, डॉ. बाबासाहेब तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे निवृत्त अधिकारी श्याम काळसेकर, युथ फेस्टिव्हल पखवाज सुवर्णपदक विजेती आंदुर्ले गावची श्रुतिका मोर्ये यांचा सन्मान केला.

### 'शासनाच्या योजना दिव्यांगांपर्यंत पोहोचवा'

**तळेरे :** आपल्या दिव्यांग बांधवांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. त्यासाठी सदैव दिव्यांगांच्या पाठीशी आहोत, असे प्रतिपादन सिंधुदुर्ग साईकृपा अपंग शक्ती बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल शिंगाडे यांनी केले. ते तळेरे येथे आयोजित दिव्यांग मेळाव्यात ते बोलत होते. येथील वामनराव महाडिक विद्यालयाच्या डॉ. एम. डी. देसाई सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन हनुमंत तळेकर यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर जिल्हा समन्वयक दीपक कापसे, सुनील तळेकर चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष चंद्रकांत तळेकर, तळेरे अविनाश मांजरेकर, शरद वायंगणकर, नीलेश सोरप, सुनील तळेकर, राजू वळंजू, शशांक तळेकर, मिनेश तळेकर, प्रभाकर ताह्मणकर, तळेरे संदीप घाडी, चंद्रकांत जाधव आदी उपस्थित होते. सिंधुदुर्ग साईकृपा अपंग शक्ती बहुउद्देशीय शिक्षण संस्था कसाल, ग्रामपंचायत तळेरे आणि सुनील तळेकर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे तळेरे, कासार्डे, ओझरम, दारुम व साळिस्ते पंचक्रोशीसाठी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

### भात भिजल्याने नुकसान

**राजापूर :** सलग चार दिवस पडणाऱ्या पावसाने भात कापणीचा खोळंबा झाला असून, कापलेले भात भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दिवसभरात कधीही पाऊस कोसळत असल्याने भात कापणी करायची कधी आणि कापणी केलेल्या भाताची झोडणी करायची कधी, असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे दिवसभराचे नियोजन बिघडले आहे. या पावसाचा परिणाम जिल्ह्यातील सुमारे ७ ते ८ हेक्टर भात क्षेत्रांवर झाला आहे. तसेच वेगवान वाऱ्यामुळे समुद्र खवळलेला असून, सलग दुसऱ्या दिवशी मच्छिमारीला ब्रेक लागला आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान केंद्राच्या सूचनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यात २७, २८, २९ ऑक्टोबरला तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याची शक्यता आहे. गुरुवार (ता. ३०) नंतर पावसाचा जोर मंदावेल. यंदाच्या हंगामात गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात भात कापणी विलंबाने सुरू झाली. नवरात्रोत्सवानंतर पाऊस थांबल्यामुळे त्याचा फायदा घेत शेतकऱ्यांनी भात कापणीला सुरुवात केली. या कालावधीत हातातोंडाशी आलेल्या पिकाचे वन्यप्राण्यांकडून नुकसान होत होते. परिणामी, शेतकरी चिंताग्रस्त झाला होता. उत्पादन वाया जाऊ नये, यासाठी रात्रीचा पहारा शेतकऱ्यांनी सुरू केला. काही शेतकऱ्यांनी पावसाचा अंदाज घेऊन कापणीला सुरुवात केली.

# अमर वार्डे.....सिर्फ नामही काफी है

**आनंद कोळगावकर**



एखाद्याचं नशीबच असं असतं की त्याच्या वाट्याला कायम संघर्षच येतो. अमर वार्डे, असंच एक रसायन. आमच्या चेंढऱ्यातील एक चळवळ्या. ताठ कणा, तसाच बाणा, कुणाचीही भिडमुर्वत न बाळगता सडेतोड, परखड भाषा, निडर अशा सर्व विशेषणांनी युक्त असे व्यक्तीमत्व...शिवाय भरघोस दाढी हे अजून एक वैशिष्ट्य...दत्ता पाटील तर त्याचा उल्लेख 'तो दाढीवाला' असाच करायचे, एवढी त्याची दाढी फेमस. असो. त्याच्या या स्वभावामुळे त्यांच सर्वतोपरी भौतिक नुकसान जरी झालं असलं तरीही समाजात ' फ्लावर नही, फायर है हम' ही इमेज मात्र नक्की झालीय. १९७२-७३ चा काळ असावा. आमच्या चेंढऱ्यात पाण्याचं प्रचंड दुर्भिक्ष. वेश्वी तळ्यातील पाण्यावर चेंढरे अवलंबून. संपूर्ण चेंढऱ्यासाठी तीनच हौद. भंडारआळी, माळ्यांची आळी आणि चेंढरे शाळेजळ, असे तीन हौद. मार्च सुरू झाला की अगदी जून-जुलैपर्यंत आम्ही ठिकरूळ नाक्यावरच्या दातार गुरूजींची विहीर किंवा जोगळेकर नाक्यावरची पोखरण यावरच अवलंबून. नगरपालिकेने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी चेंढरेकरांची रास्त मागणी, तत्कालीन नगराध्यक्ष भाऊ खानविलकरांनी दुर्लक्षित केली. मला आठवते नाक्यावरच्या मारूतीमंदीरात गावकऱ्यांनी मिटींग बोलावली होती. प्रतिष्ठीत ज्येष्ठ नाना रानवडे यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग. वार्डे गुरूजींचा मुलगा अमर वार्डे त्यावेळी चेंढऱ्यामधून नव-नेतृत्व उदयास येत होतं. अमर गावात सुशिक्षित शिवाय मुद्देसूद वक्तृत्व आणि धडपड्या स्वभावामुळे, सर्वानुमते असं ठरलं की, अमर वार्डेच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेवर हंडा मोर्चा काढायचा.

मोर्चाचा दिवस उजाडला. सकाळी दहा-साडेदहाच्या सुमारास सर्व गावकरी, विशेषत: महिलावर्ग मारूती मंदीराजवळ खूप मोठ्या संख्येने जमा झाले. प्रत्येकाच्या डोईवर कळशी, हंडा घेवून दगडखड्याने हंडा वाजवीत मोर्चा निघाला. मीही मोर्चात होतोच. अजून ते चित्र डोळ्यासमोर येतं. मारूती मंदीर-ठिकरूळ नाका-जोगळेकर नाका-बालाजी नाका करीत मोर्चा नगरपालिकेवर गेला. नगराध्यक्ष खानविलकर म्हणजे त्याकाळी बडं प्रस्थ. त्यांना हे मोर्चा प्रकरण पसंत नव्हतं तरीही ते सामोरे आले.....चर्चेने प्रश्न सुटला. विशेष म्हणजे मोर्चाची कुठलीही नोटीस न देता, पोलीस परवानगी न काढता तो हंडा मोर्चा निघाला होता...तसा बेकायदेशीरच. या मोर्चाचं चांगल फलीत म्हणजे अमर वार्डेंच नेतृत्व अलिबागेत स्थापित झाले.

लगेचच्या नगरपालिकेच्या निवडणुकीत ॲड.राम पाटलांच्या नेतृत्वाखाली 'शहर विकास आघाडी' स्थापन झाली.

विशेष म्हणजे त्यांचे निवडणूक चिन्ह होते.....हाताचा पंजा. नंतर ते काँग्रेसला दिलं गेलं. चेंढऱ्यातून अमर वार्डे आणि दत्तात्रय घरत (दत्तू मेस्त्री) असे दोघेही निवडून आले. अमर वार्डे यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरवात झाली. अमरची अलिबाग नगरीप्रतीची आस्था आणि विषयाचा अभ्यास याचा नगराध्यक्ष भाऊ खानविलकर यांच्यावर चांगला प्रभाव पडला आणि लवकरच अमर वार्डे खानविलकरांच्या गुडबुक्समध्ये आला. वस्तुत: अमर समाजवादी विचारसरणीचा. काही काळ त्यांनी मुंबईमध्ये समाजवादी व नंतरच्या जनता पक्षाच्या ऑफीसमध्येही काम केले. त्यामुळे मधू दंडवते, जॉर्ज फर्नांडीस आदी समाजवादी मंडळींचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यामुळेच की काय, अलिबागेत खानविलकरांच्या संपर्कात येवूनही अमरने कधीही काँग्रेस पक्ष जॉईन केला नाही. १९७९ हे वर्ष अमरच्या नेतृत्वाला झळाळी देणारं ठरलं. अलिबाग शहरातही विकासासंदर्भात दोन गोष्टी घडल्या. एक म्हणजे श्रीबाग क्षेत्रविकास योजना आणि त्याच सुमारास कार्यान्वित झालेली उमटे पाणी पुरवठा योजना. अमर तरूण होतकरू होता, सुशिक्षित, प्रामाणिक आणि समाजकामासाठी वेळ देणारा, चांगले व्हिजन असल्याने साहजिकच खानविलकरांच्या अगदी विश्वासातील बनला आणि त्यांनीच अमरकडे नगरपालिकेचे पाणी खाते सोपवले. अलिबागेत त्यावेळी घरोघरी नळ ही संकल्पना अमरने यशस्वीपणे राबवली. नगरसेवक असूनही अमरने क्षेत्रविकासमध्ये एकही प्लॉट घेतला नाही हे विशेष. श्रीबाग क्षेत्रविकास योजनेचे भराव वगैरे कामे चालू असतानाच सरकारने राज्यातील सर्व नगरपालिका बरखास्त केल्या.

या संपूर्ण कारकिर्दीत अमरला नगरसेवक म्हणून आणि पाणी कमिटी सभापती म्हणून बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. प्रशासनातील बारकावे, खाचाखोचा, त्रुटी यांचा अभ्यास करता आला. याचं उत्तम उदाहरण म्हणजे चेंढरे ग्रामस्थांची स्मशानभूमी.सध्या श्रीबागमध्ये जे गणपती मंदीर आहे, अगदी त्याच ठिकाणी चेंढरे गावासाठीचे स्मशान होते. विकास आराखड्यात त्या स्मशानभूमीसह प्लॉट पाडले गेले आणि चेंढरेकरांची पंचाईत झाली. गावकऱ्यांनी आणि अमरनेही अनेक पत्रव्यवहार केले. परंतु रिझल्ट मात्र येत नव्हता. चेंढरेकर तिथेच वस्तीला लागूनच दहनकार्य करत होते. त्यामुळे रहिवाशांमध्ये घबराट पसरली जात होती. अशावेळी शेवटी प्रश्न कलेक्टरांकडे गेला. मिटींगमध्ये नगरपालिका सीओ, टाऊन प्लानिंग अधिकारी असे होते..

अमरही होता. मिटींगच्या सुरूवातीलाच अमरने प्रश्न उपस्थित केला की शहराच्या विकास आराखड्यामध्ये स्मशानभूमी कुठे आहे? सर्वच अधिकारी या अनपेक्षित प्रश्नाने गडबडले... त्यांची तत पप सुरू झाली. कारण शहरातील नागरिकांसाठी म्हणून जी रामनाथची स्मशानभूमी आहे ती आहे वरसोली हद्दीत. शहराच्या विकास आराखड्यात स्मशानभूमीच नव्हती. अमरच्या या गुगलीने सर्वांची दांडी गुल झाली. कलेक्टरांनी निर्णय दिला आणि रायगड बाजारपाठीमागे स्मशानभूमीसाठी जागा मुक्रर झाली. अमरच्या डोकॅलिटीचा हा परिणाम ! राजकारण असो की समाजकारण, पत्रकारीता असो की शिक्षण क्षेत्र असो, अमर वार्डे कायम तत्वनिष्ठ म्हणूनच कार्य करत राहिला.

तत्वाशी कधीही तडजोड नाही. अर्थात त्याची ही तत्वनिष्ठाच त्याची असेट ठरली...... बरेच वेळा नुकसानीतील असेट! मला नेहमीच वाटतं की अमर वार्डेनी सार्वजनिक जीवनात वावरताना थोडी लवचिकता दाखवली असती, आपल्या तत्वांना थोडी मुरड घातली असती तर? पण हे होणे नव्हते ....मोडेन पण वाकणार नाही हाच बाणा अंगिकारत अमर सदोदित वावरला. १९८० साली विधानसभेसाठी जनता पक्षातर्फे एमपी पाटील यांच्याऐवजी अमरला आग्रह होत होता, असं म्हणतात. याच निवडणुकीत गावोगावच्या अनेक जाहीर सभा अमरने आपल्या ओघवत्या वक्तृत्वाने गाजवल्या. चेंढरे नाक्यावरचे जुने मारूती मंदीर आता जिर्णोध्दाराच्या प्रतीक्षेत होते. अर्थात पुढाकार अमरनेच घेतला. गावकीची मिटींग घेवून कमिटी ठरली. अध्यक्ष हनुमानभक्त गणेश टींबरचे बाबुभाई पटेल. दत्तात्रय घरत, नरेंद्र पाडावे, बबन मोरे, सुभाष म्हात्रे आदी गावकरी आणि स्वत: अमर अशी कमिटी बनली. अमर झपाटल्यासारखा कामाला लागला. आर्किटेक्ट, कंत्राटदार ठरवणे, देणग्या गोळा करणे आणि या सगळ्याचे आर्थिक नियोजन हेही महत्वाचे होतेच. सर्व गोष्टी जमून आल्या आणि सध्याचे मारूती मंदीर साकार झाले. देवळाची जागा रस्ता रूंदीकरणात जात होती. अमरने सरकार दरबारी खेटे घालून त्याचे लाखो रूपये मिळवून दिले. खरं तर अमरने लक्ष घातले नसते तर कदाचित देवळाचा जिर्णोध्दार झालाच नसता.....पण लक्षात कोण घेतो. इथेही राजकारण झाले आणि अमर स्वेच्छेने मंदीर ट्रस्टमधून बाहेर पडला. अमरवर अनेक संघर्षाचे प्रसंग आले. अर्थात समाजासाठी म्हणून, बरेचशे त्यानी स्वत:हून ओढावून घेतलेले. बेलीगावच्या मिठागराचा प्रसंग असो की रायगड बाजारची कोर्ट कचेरी असो की शाळेच्या मान्यतेच्या प्रश्नावर जिल्हा परिषदेसोबत केलेली कोर्टबाजी असो....अमर नेहमीच आपल्या भूमिकेशी कुठलीही तडजोड करता ठामपणे लढत राहिला....त्यात त्याने यशही मिळाले. रायगडमध्ये पत्रकार म्हणून भाऊ सिनकर आणि अमर वार्डे हेच दोघे अनेक वर्ष जनतेच्या ओळखीचे.....बाकीही होते. परंतु हे दोघेच ताठ कण्याचे. सत्ता कोणाचीही असो सत्यासाठी सत्तेसोबत दोन हात करण्याची, परिणामांची कसलीही तमा न बाळगता संघर्ष करणे आणि कार्य सिध्दीस नेणे....हे काम येरा गबाळ्याचे नोहे. आणि म्हणूनच मुंबई-पुण्यामधील वरिष्ठ पत्रकार, अलिबागचे पत्रकार म्हणून हीच दोन नावे सांगतात. खर तर अमरकडे पाहिल्यावर ''काय हा रूक्ष माणूस'' असा प्रश्न पडेल. पण क्रिकेट, सिने संगीत, सिनेमा, नाटक आणि साहित्य या विषयातही चिक्कार इंटरेस्ट अमरला आहे, हे त्याच्याबरोबर गप्पा मारल्या तर लक्षात येईल. एक गंमत सांगतो, अमरला लंडन हाऊस ऑफ कॉमन्समध्ये लंडन निवासी भारतीयांकडून एक पुरस्कार दिला गेला.

आता, पुरस्कार समारभानंतर कुणीही लंडन राजवाडा किंवा बाकी प्रेक्षणीय स्थळे पाहिलना! पण अमर मात्र गेला तो फक्त शेक्सपियरचे घर बघायला! आता काय म्हणावे? खरं तर यावरूनच त्याची उच्च अभिरूची व्यक्त होते! वार्डे गुरूजींचा मुलगा आणि शिक्षण क्षेत्रात नाही, असं कसं होईल? तो काळ आठवा, अलिबागेत फक्त कोकण एज्युकेशन सोसायटीच होती. अलिबागकरांना मात्र आता पर्याय हवा होता. आरसीएफच्या स्कुलचं ते तसं भलतंच ! अमर वार्डेच्या पुढाकाराने वरसोली येथे इंडीयन एज्युकेशनची शाळा सुरू झाली. अथक मेहनतीने अमरने ती शाळा नावारूपास आणली आणि आयईएसच्या एका निवडणुकीने होत्याचे नव्हते झाले. अमरला शाळेतून बाहेर पडावे लागले. आता पुढे काय? साहजिकच असा प्रश्न मनात आला. समोर साराच अंधार होता. अमरलाही पन्नाशी ओलांडून साठीची चाहूल लागली होती. चळवळ्या अमर गप्प बसला तर तो अमर कसला! एरवी खरं तर हे निवृत्तीचे वय....पण अशक्य हा शब्दच माहित नसलेला अमर वार्डे नवीन शाळेच्या तयारीला लागला. खानविलकरांच्याच जागेत दत्ताजीराव खानविलकर एज्युकेशन ट्रस्ट (डिकेएटी)च्या शाळेची मुहुर्तमेढ उभारली गेली. ट्रस्टचे अध्यक्ष अर्थातच अमर वार्डे. अगदी त्याचवेळी योगायोगाने अलिबागेतीलच केळकर कुटुंबियांनी अगदी मोक्याची जागा शाळेसाठी दिली.....बहुमोल मदत !बघता बघता बायपासवर चिंतामणराव केळकर विद्यालय उभे राहिले. आज अलिबागेतील एक चांगले शिस्तबद्ध आणि चांगली शैक्षणिक सुविधा असलेली शाळा म्हणून चिंतामणराव केळकर हायस्कुल नावारूपास आलेय. अनेक राजकीय अडथळे, अनेकवेळा आर्थिक विवंचना, अनेक प्रशासकीय अवघड प्रसंग, प्रसंगी अवहेलनाही....या सर्वांवर यशस्वीपणे मात करून आज केळकर विद्यालय यशस्वीपणे उभे आहे. अमर वार्डेच्या जिद्दीला, खमकेपणाला, चिकाटीला खरोखरच सलाम! कॉलेजमधून बाहेर पडलेला वार्डेगुरूजींचा मुलगा हीच ओळख असलेला अमर राजकारणात गेल्यावर मात्र अमरभाई म्हणून ओळखला जावू लागला. राजकारणाचे शटर बंद केल्यावर शैक्षणिक क्षेत्रात नावारूपाला आल्यावर मात्र आता अमर, वार्डेसर या भूमिकेत चांगलाच स्थिरावलाय. अर्थात सध्याच्या राजकीय तडजोडीच्या वातावरणामध्ये त्याच्यासारख्याच्या तत्वनिष्ठ माणसाने न पडलेलेच बरे! असो.

आज अमर वार्डे यांना पंचाहत्तर वर्ष पूर्ण होताहेत. लौकीक अर्थी हे 'हरी हरी' करण्याचे वय. पण स्वप्न बघणे नी ते पूर्णत्वास नेणे हाच एकमेव ध्यास असलेला अमर वार्डे आता दहावीपर्यंत असलेली शाळा, बारावी कशी सुरू करता येईल याचा विचार करतोय. हॅट्स ऑफ ! बरेच वेळा प्रश्न पडतो की एवढ्या आघाड्यांवर लढायचं, सगळ्यांशी पंगा घ्यायचा नी न्याय मिळवायचा....हे सारं कसं जमतं ? कुठुन बळ येतं? मला वाटतं, जे आपल्याला जमत नाही ते सारं अमरला जमतं, ही दबंगगीरी जनतेला आवडते....त्याच जनतेचं सुप्त प्रेम, अघोषित पाठींबाच अमरला हे बळ देतं. काहीही असो....अमर वार्डे, सिर्फ नामही काफी है, हेच खरं! आज अमर वयाची पंचाहत्तरी पूर्ण करतोय. वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा ! ●●●

## निवडक

### रायगड जिल्हा युवा महोत्सव

**रायगड** : युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरा जपणे तसेच युवकांच्या सुप्त गुणांना वाव देत राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे, या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर रायगड जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन बुधवारी (दि.२९) करण्यात आले आहे. या महोत्सवात युवकांसाठी विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) या उपक्रमांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या १५ ते २९ वयोगटातील युवक-युवती तसेच युवा मंडळांनी २८ ऑक्टोबर रोजी सायं. ५ वाजेपर्यंत आपली ऑनलाइन नोंदणी ई-मेलद्वारे करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

### डॉ. देविदास बामणे यांचा सन्मान

**पेण** : महाराष्ट्र साहित्य साधनातर्फे दिवाळीनिमित्त आयोजित केलेल्या बालगीत स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. देविदास बामणे यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या बालगीत लेखनातील सृजनशीलता व मुलांच्या भावविश्वाला साजेशी अभिव्यक्ती याबद्दल परीक्षकांनी त्यांची प्रशंसा केली. साहित्य साधना संस्थेच्या समितीने विविध लेखकांकडून प्राप्त झालेल्या बालगीतांची निवड प्रक्रिया पार पाडली. या स्पर्धेत डॉ. बामणे यांच्या बालगीताने विशेष ठसा उमटवत प्रथम क्रमांक मिळवला. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मुलांना कल्पनाशक्तीची देणगी देणारे लेखन सादर केल्याबद्दल त्यांना हा सन्मान करण्यात आला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णत: डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549
- ऑफिस कामाकरीता अनुभवी अकाऊंटंट महिला/मुलगी पाहिजे. अनुभव २ ते ३ वर्षे शैक्षणिक पात्रता बी.कॉम टायपिंग व बेसिक कॉम्प्युटर पगार रू.१०,०००/- ते १२,०००/- संपर्क : मु.पो.झिराड, ता.अलिबाग जि.रायगड मोबा नं. ८९८३०९३३५३/८००७४८२२९८
- ''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड मार्गाची अवस्था बिकट

**● खड्डेमय रस्त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांची गैरसोय**

। रायगड । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड हा मुख्य व अत्यंत महत्त्वाचा रस्ता गेल्या काही महिन्यांपासून अक्षरशः खड्ड्यांनी व्यापला असून, त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पावसाळ्यात काही ठिकाणी खड्ड्यांची खोलगट तळी बनली होती. पाऊस ओसरूनही परिस्थितीमध्ये सुधारणा न झाल्याने वाहनचालकांचा त्रास अधिकच वाढला आहे.



रस्त्यावरील काही खड्ड्यांमध्ये फक्त तात्पुरती खडी टाकण्यात आली आहे; मात्र ही खडी सतत रस्त्यावर पसरलेली असल्यामुळे विशेषतः दुचाकीस्वार व सायकलस्वार घसरून अपघातग्रस्त होत आहेत. अनेक जण जखमी होत असून, रस्त्यावर खडी पसरवण्याची सध्याची पद्धत ही धोकादायक असल्याची टीका नागरिकांनी केली आहे. रात्री तर रस्ता अधिकच गंभीर स्वरूप धारण करतो, खड्डे व खोलगट भाग दिसतच नाहीत. काही वाहनचालकांना अचानक पुढे येणारे खड्डे टाळण्यासाठी ब्रेक मारावे लागतात आणि मागून येणाऱ्या वाहनांशी धडकण्याची शक्यता निर्माण होते.

येत्या काही दिवसांत आवास-नागेश्वर व कनकेश्वर या धार्मिक यात्रांचा कार्यक्रम पार पडणार आहे. जिल्हाभरातून बैलगाड्या, खासगी वाहने, पर्यटन बस या मार्गाने मोठ्या संख्येने भाविक येणार आहेत; मात्र सध्याची रस्त्याची अवस्था पाहता यात्रेकरूंना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

गावकरी, वाहनचालक, सामाजिक संघटना यांनी वेळोवेळी संबंधित विभागाला निवेदने देऊनही परिस्थिती जशीच्या तशी आहे. ठेकेदार आणि प्रशासन या दोघांचेही निष्क्रिय धोरण म्हणून टीका होत असून, कामाचा नियमित आढावा घेण्याची मागणी पुढे येत आहे.

# रंगवल्ली कलादर्शन मार्फत रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी ।

नामवंत ज्येष्ठ कलाकार आणि रांगोळीकर यांना आदरांजली वाहत रंगवल्ली कलादर्शन मार्फत रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर, या प्रदर्शनाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करीत बाल कलाकारापासून ज्येष्ठ कलाकारांनी सहभाग घेतल्याने उरणकरांना कलेची रंगीत मेजवानी मिळणार आहे.

उरणमधील ज्येष्ठ कलाशिक्षिका प्रियवंदा तांबोटकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले आहे. उरण तालुक्यातील हौशी कलाकारांसमवेत शालेय विद्यार्थी आणि कलेमध्ये प्रभुत्व असलेल्या कलाकारांनी सहभाग घेतला आहे.

यंदाच्या या रांगोळी प्रदर्शनाच्या माध्यमातुन उरण तालुक्यातील नामवंत आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिवंगत कलाकारांना आदरांजली वाहण्यात आली आहे. यामध्ये, ज्येष्ठ कलाशिक्षक आणि रंगवल्ली कलादर्शनचे संस्थापक नंदकुमार साळवी, वसंत गावंड यांच्या कलेचा आदर करणारी रांगोळी साकारण्यात आली आहे. तसेच, प्रदर्शनाच्या माध्यमातून आम्हाला ही जगू द्या या मथळ्यान्वये प्राण्यांना जगण्याचा अधिकार असल्याचा सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले आहे.तसेच, रंगवल्ली कलादर्शन मार्फत आयोजित या रांगोळी प्रदर्शनामध्ये कलेचे उच्च शिक्षण घेतलेल्या आतिष मंचेकर, सिद्धार्थ नागवेकर, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त स्वप्नाली मंचेकर, कलाशिक्षक संतोष पाटील यांनी देखील त्यांच्या कलेतून आपले प्राविण्य दाखवून दिले आहे. या प्रदर्शनात सिंधुताई सकपाळ, स्वामी समर्थ, साधू, राधा-कृष्ण यांच्या रांगोळी साकारण्यात आल्या असल्याचे राजेश नागवेकर यांनी सांगितले आहे

# बाहे-देवकान्हे येथील महिलांना दिले स्वयंरोजगाराचे धडे

। रोहा । प्रतिनिधी ।

कृषिनिष्ठ बाहे गाव व देवकान्हे गावातील महिलांनी स्वतःचा व्यवसाय करून त्यांनी स्वयंरोजगार करावा, यासाठी शिलाई मशीन व्यवसायाचे प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच यशस्वीपणे पार पडला.

रेस्टी स्टार स्वयंरोजगार संस्था अलिबाग यांच्या वतीने व बँक ऑफ इंडिया यांच्या सौजन्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे रोशन पाटील व अनिता मोरे यांनी या प्रशिक्षण शिबिरात महिलांना सर्वोत्तम मार्गदर्शन केले.

सलग २० दिवसांहून अधिक दिवस चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात बाहे व देवकान्हे गावातील विविध बचत गटातील सुमारे ९० महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या शिबिरात कापडापासून उशी कव्हर, पेन पाऊच, हात पिशवी, हातरूमाल आदींसह अन्य कापडकाम शिकविले.

# भाल परिसरात विद्युत पोल पडल्याने अंधार

**वडखळ :** भाल तुकाराम वाडी परिसरात चार-पाच विद्युत पोल पडल्याने ऐन दिवाळीत गाव अंधारात होता. याबाबत ग्रामस्थांनी शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख समीर म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली एमएसईबी कार्यालयावर धडक दिली. या वेळी तत्काळ संबंधित अधिकारी यांनी विद्युत पूल उभारण्याचे आदेश देत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. परिसरातील पडलेले विद्युत पोल तत्काळ उभे करण्याची मागणी केली.

# शिक्षणतज्ज्ञ रमेश खानविलकर यांचा दिवाळीत गरीब भेटदौरा

। पोलादपूर । प्रतिनिधी ।



दिवाळी सणाच्या काळात उपेक्षित राहणाऱ्या आदिवासी पाडा, अनाथाश्रम, वृध्दाश्रम आणि गरीब वस्त्यांमध्ये शिक्षण तज्ञ रमेश खानविलकर यांनी दरवर्षीप्रमाणे आदिवासी पाड्यात, अनाथाश्रमात, वृध्दाश्रमात तसेच देवस्थानांमध्ये तेथे वस्त्रदान, मिठाई व अन्नदान करून दिवाळी गरीबभेट दौऱ्याने साजरी केली.

वृध्दापकाळातील समस्यांची राज्यात भयाण वास्तवता आहे. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे झाली तरी कुडाच्या झोपड्यांतील मुले आजही शाळेत जात नाहीत. अनाथाश्रमात, रेल्वे प्लॅटफॉर्मवर, कचराकुंडीच्या बाजूला, गर्दीच्या ठिकाणी, जत्रेत अन् वेगवेगळया शहरात सोडून दिल्याने अशी हरवलेली व्यक्ती अनाथाश्रमात अथवा वृध्दाश्रमात उर्वरित आयुष्य जगताना दिवाळीच्या आनंदाचा गंधही त्यांना नसतो राज्यशासनाने अशा अनाथांसाठी धोरण आखण्याची आवश्यकता आहे, अशी अपेक्षा रमेश खानविलकर व्यक्त केली.

## जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना होणार लाभ

# गणित, विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

। रायगड । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांचे गणित आणि विज्ञान विषयातील पायाभूत ज्ञान दृढ करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारमार्फत डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी खान अकादमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.

राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिली ते दहावीसाठी खान अकादमीची जागतिक दर्जाची आणि राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित, विज्ञानविषयक शैक्षणिक सामग्री अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल.

खान अकादमी सहावी ते दहावीसाठी असणारी विज्ञानविषयक शैक्षणिक सामग्री इंग्रजी आणि मराठी भाषेत तसेच महाराष्ट्र राज्य मंडळाशी संलग्न स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय, राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत शिष्यवृत्तीसाठी तयार अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला आहे.

गणित आणि विज्ञान विषयातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे पायाभूत ज्ञान दृढ करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्य शासनामार्फत डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी खान अकादमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कुतूहल यांचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे प्रख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबविला जात आहे.

या उपक्रमाचा फायदा शालेय विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

चित्रफित आधारित धडे आणि सराव प्रश्न चित्रफित वापरून शिक्षक अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील, तसेच विद्यार्थ्यांना चित्रफित-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या माध्यमातून संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल. या उपक्रमाद्वारे भौगोलिक व साधनसंपत्तीच्या अडचणी दूर करून, लाखो विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कुतूहल आणि महत्त्वाकांक्षा यासह शिकण्याची संधी उपलब्ध होईल.

# युती-आघाडी गुलदस्त्यात

**● आमिषाला मतदार पडताहेत बळी**

। उरण । प्रतिनिधी ।

निवडणुकीचं आरक्षण जाहीर होऊनही राजकीय पक्ष, नेतेमंडळी आणि इच्छुकांमध्ये शांतता, राजकीय रणभूमी तयार झाली आहे, पण सैनिक अजून झोपेत आहेत.राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत सुरू असली, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोण कुणाशी युती करणार, की स्वबळावर झेंडा उभारणार हे अजून गुलदस्त्यातच आहे.

निवडणूक आयोगाचा कार्यक्रम जाहीर न झाल्याने इच्छुकांची हालचाल खुंटली असली, तरी काही महत्त्वाकांक्षी मंडळी खुर्चीच्या नशेत पक्षांदरम्यान बेडूक उड्या मारू लागली आहेत. नगरपालिकेचं नगराध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित झाल्याने अनेकांचे राजकीय स्वप्न उद्ध्वस्त झाले, तर जिल्हा परिषदेतील चाणजे व नवघर या महिला आरक्षित जागांमुळे नाराजीचा सूर तीव्र झाला.

खरी शोकांतिका मात्र दुसरीच आहे. निवडणुका विकासावर जिंकल्या जात नाहीत, तर मतदारांच्या आमिषावर! रस्ते, पाणी, गटार, शाळा या विकासाच्या गोष्टी मतदार विसरलेत; आता नोटा, बाटल्या आणि जेवणाच्या डब्यांनीच मतं मिळतात. ज्याचं पाकीट मोठं, त्याचं मतपेटीत राज्य! उरणमध्ये हीच चर्चा रंगतेय. आरक्षणाला आठवडा उलटूनही ना महायुतीकडून मोर्चेबांधणी, ना महाविकास आघाडीचा आवाज, राजकीय पक्षांची ही झोप म्हणजे वादळापूर्वीची शांतता की नेतृत्वाचं दिवाळं, हे येणारे दिवसच ठरवतील.

# महेश निमणेंना वास्तुशास्त्र, अंकशास्त्रात पीएचडी



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खोपोली येथील शहरात वास्तुशास्त्र व अंकशास्त्राच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करीत असताना आता डॉक्टरेट ही पदवी संपादन केली आहे. मथुरा हिंदी विद्यापीठ येथे या पीएचडी सन्मान सोहळा हॉटेल रेडीसन ब्लू, पश्चिम विहार, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता.

आपल्याजवळ असलेल्या ज्ञानाचा उपयोग समाज कल्याणासाठी व्हावे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून महेश निमणे यांनी ही पदवी प्राप्त केली. यावेळी सन्मानपत्र, मेडल, शाल असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

गेली अनेक वर्षे वास्तुशास्त्र व अंकशास्त्र यामध्ये आपले कौशल्य पणाला लावून त्यांनी चिंतेने ग्रासलेल्या, व्यवसायात अथवा कर्जामध्ये असलेल्या अशा अनेक समस्यांमध्ये व्यथित व्यक्तीस या माध्यमातून मार्गदर्शन केले. तालुक्यातून प्रथमच व्यक्ती वास्तुशास्त्र या विषयात डॉक्टरेट झाली असून, सर्व स्तरावर कौतुक होताना दिसून येत आहे.

गेली अनेक वर्षे सुखी वास्तु स्पिरिच्युअल सर्व्हिसेस या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकांना यांच्या अनुभवातून नैसर्गिक उपाययोजनांद्वारे लाभ प्राप्त झाला आहे.

---

## उरण नगरपरिषद, उरण

ता.उरण, जिल्हा-रायगड पिन कोड ४०० ७०२
Email ID : municipalcounciiuran@gmail.com

जा.क्र.:उनप निवडणूक अं.आरक्षण १८७१/२०२५-२०२६ दिनांक :-२७/१०/२०२५

**उरण नगरपरिषद, सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**अंतिम आरक्षण अधिसूचना प्रसिद्धीबाबत**
**जाहीर सूचना**

उरण नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी अंतिम आरक्षणास मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडील आदेश क्र. नपत्र/कार्या-२/स्था.स्व.सं.निवडणूक २०२५/२०६४ दिनांक २४/१०/२०२५ अन्वये मान्यता मिळाली असून शासन राजपत्रात अधिसूचना दिनांक २८/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यांत येत आहे. अंतिम मंजूर आरक्षण अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी नगरपरिषद कार्यालयामध्ये पाहणेसाठी उपलब्ध आहे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- २७/१०/२०२५

सही/-
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद उरण**

---

## कर्जत नगर परिषद

KARJAT MUNICIPAL COUNCIL
ता. कर्जत जि. रायगड पिन - ४१०२०१
E-mail : karjatcouncil@gmail.com
ऑफीस : ०२१४८-२२२०३३ Fax :२२१३१२

जावक क्रमांक इ.बां.वि./२०५५/२५-२६ दिनांक २७/१०/२०२५

**जाहिर नोटीस**

**विषय:-** मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील स.नं. ७ व मधील प्लांट नं. ९ व १३ मधील मंजूर अभिन्यासातील ६.०० मी. रुंदीचा रस्ता ९.०० मी. प्रस्तावित करणेबाबत.

या नोटीसीद्वारे कर्जत नगरपरिषद रस्ता हद्दीमधील नागरीकांना कळवण्यात येतं की, विषयामध्ये नमूद केलेला रस्ता रुंद करण्याबाबत प्रस्ताव नगरपरिषदेने हाती घेतलेला आहे. सदर रस्ता हा ३० फुट (९.० (मी) रुंदीचा करणेत येत असून त्याची आखणी ही नकाशावर करणेत आलेली असून त्याप्रमाणे जागेवर ही आखणी करणेत आलेली आहे व त्याप्रमाणे रस्ता बनविणेत येणार आहे. तसेच त्यासंदर्भात नगरपालिका ठराव क्र ३७० दि. २४/१०/२०२५ अन्वये पारीत केलेला आहे.

सदर कार्यवाही ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ चे कलम १७५ व १७६ नुसार करणेत येत आहे.

वरील बाबतीत कोणचेही काही म्हणणे असल्यास ती या नोटीशीचे दिनांकापासून एक महिन्याचं आत मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद यांचेकडे कायदेशीर कागदपत्रासह सादर करावे. रस्ता आखणीचे नकाशे नगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध आहेत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद कर्जत**

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**ई निविदा सूचना क्रमांक ५०/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती.....महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील व अतिरिक्त सांडपाणी निःसारण योजनेच्या जुने व खराब झालेल्या पंपाचे फॉउंडेशन बदलणे व विविध किरकोळ कामे करणे. | ₹३७,८२,४३४.०० |
| २ | रानसई आणि पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... उद्योग सारथी भूखंडामधून स्टॉक साहित्य व खराब झालेले पाईप, जुन्या ऑफिसच्या समोर हालविणे. | ₹३,३४,९५४.०० |
| ३ | नागोठाणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अशुद्ध जलउदंचन केंद्राच्या पंपिंग स्टेशनसाठी एचटी वीजपुरवठा प्रणालीचे मजबुतीकरण करणे. | ₹३९,७९,७६०.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सावणे गावाकडे जाणारा रस्ता, मे. एचपीसीएल प्लॉट, सीएफसी इमारतीच्या मागील बाजूचा रस्ता, जुना व नवीन जलशुद्धीकरण केंद्र, एचएसआर, जॅकवेलकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे भरणे. | ₹२३,२६,६८२.०० |
| ५ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ७०० मि.मी. व्यासाच्या सांडपाणी निःसारण वाहिनीचे आपत्कालीन दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे. | ₹३९,५०,१०३.०० |
| ६ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... अशुद्ध जलउदंचन केंद्रातील पंपिंग स्टेशनवर बसवलेल्या ३३५ एचपी व्हीटी पंपसेटची दुरुस्ती करणे. | ₹३८,०८,१००.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २९/१०/२०२५ ते दिनांक १२/११/२०२५ पर्यंत : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३१/१०/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक ०४/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे आसल, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे मालक व कब्जेदार अश्विनी कुंडलिक शेंडे वगैरे यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे आसल, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| २९ | - | ०.१०.१० | ०-२८ |
| | | ०.०१.०० | |
| | | एकुण क्षेत्र ०.११.१० | |

सदर मिळकत तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन दोन दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजीस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास व त्यांनी हरकत न नोंदविल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- मु. पो. शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा. नं. ७७९८२१०७७८

**ॲड. निलेश सुदाम कुंभार**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. बारतुला विजय के. शर्मा | ३५/२/अ/२ | १-२८-०० | ०-९८ |
| | ३५/२/अ/३ | ०-६१-५० | ०-४८ |
| | ३५/२/अ/४ | ०-६६-०० | १-०६ |
| | ३५/८ | ०-७३-०० | ०-६० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त , चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २८/१०/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेला वाणिज्य गाळा कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक मुकेश भुरमल जैन यांचेसोबत चालु आहे. सदरचा वाणिज्य गाळा हा निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर वाणिज्य गाळ्याच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील सर्वे नं. १२२/१अ, सिटी सर्वे नं.११०७ व ११०८/३/ब या मिळकतीवर असलेल्या "सावित्री पर्ल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या इमारतीमधील तळ मजला, इ विंग, सदनिका नं. २४ गाळा, नवीन मालमत्ता नं.ALB000004617, जुना मालमत्ता नं. Z1BHA004672,क्षेत्र १२.३५ चौ.मीटर, मालमत्ता पत्ता-१६१९/२३, बाम्हण आळी, अलिबाग.

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे/वाणिज्य गाळा संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त , पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ८ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांसकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचे/वाणिज्य गाळ्याचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. नभेश. भ. ठाकुर**
Gurudatta Co Op. HSC.A-Wing,
Shop No.7, Near KES school,
Court Road, Tal. Alibag.
mobile no-7066709597

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म. र अर्ज २२८/२०२५

**जाहिर नोटीस**

श्री.राकेश रामचंद्र पाटील, — अर्जदार
रा.मु.एकदरा, पो.राजपुरी,
ता.मुरुड. जि.रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत एकदरा,
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि.२५/०८/१९८४ रोजी मौजे एकदरा, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत एकदरा, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २५/०८/१९८४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता. १५/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमच्या अशिलांनी श्री. गौतम लक्ष्मण मोरे, रा. मौजे गांधारपाले, ता. महाड, जि. रायगड यांच्याकडून खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत व त्यावरील आर.सी.सी. बांधकाम केलेले तळमजला व वरील मजला असे एकूण क्षेत्र १३४६ चौ. फूट एकत्रित खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ५५/३/ब | १००५९ | ०.०१.४५ | २.८१ |

वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थानी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २८/१०/२०२५
ठिकाण : अलिबाग.

सही/-
खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. जुईली अनिल मुकादम**
(बी.एल.एस.एल.एल.बी)
पत्ता : ओम चिंतामणी सोसायटी
काकासाहेब गाडगीळ मार्ग, खेडगल्ली
प्रभादेवी, मुंबई-४०००२५

---

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१६/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालय**

कु. ओमकार उमेश तटकरे
वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, — अर्जदार
रा. कसबेवाडी, पो. निजामपूर,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार कु.ओमकार उमेश तटकरे यांची आजी कै.सत्यवती उर्फ निरा दत्ताराम तटकरे ही दि. १५/०२/२०१५ रोजी मौजे कसबेवाडी, ता.माणगांव, जि.रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. तिची मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ३३८/२०२५ ने दि. २३/०४/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आजी कै. सत्यवती उर्फ निरा दत्ताराम तटकरे ही दि. १५/०२/२०१५ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार कु. ओमकार उमेश तटकरे यांची आजी कै. सत्यवती उर्फ निरा दत्ताराम तटकरे ही दि. १५/०२/२०१५ रोजी मौजे कसबेवाडी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव :
ता.:१२/०९/२०२५

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

---

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक भालचंद्र महादेव पाटील, वगैरे ६ यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| सुरई, ता.मुरूड | १२६ | ०-८७-९० | ०.७१ |
| | | पो.ख. ०-३३-५० | |
| | | एकुण १-२१-४० | |

वर नमुद केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २७/१०/२०२५

सही
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुधिर पांडुरंग बाबरे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविल्या आहेत सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७५ | २ | ०-३६-७० | ४-३७ |
| ७८ | ४ | ०-१०-०० | १-०६ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २८-१०-२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :- मौजे तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| अमित प्रभाकर सावंत | २ | ४/अ/९ | ३-६०-०० | ३६ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला,
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड.निलेश दामु मुंढे**
दिनांक : २८/१०/२०२५
मो.नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद बिनशेती वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सचिन विश्वनाथ पाटील, यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद बिनशेती मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यनिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| | सर्व्हे नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै) |
|---|---|---|---|
| मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड | ८७/३/क/३/ड/११ | २-७३-०० | २७.३० |

अलिबाग,
दि. २७/१०/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shiva Chouk,
Near Gawade Optics, Alibag Raigad

---

दिनांक : २७/१०/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २१३/१, क्षेत्र ०-६७-७० हे.आर. पो. ख. ०-११-१० हे.आर., एकुण क्षेत्र ०-७८-८० हे.आर., आकार ११.१५ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२५-९० हे.आर.पो. ख. ०-०४-३० हे.आर., एकुण क्षेत्र ०-३०-२० हे. आर. आकार ४.२७ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक जयश्री चंद्रशेखर उपरकर, सतिश शामकांत भगत, प्रदीप शामकांत भगत व अजित शामकांत भगत सर्व रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २७/१०/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागझरी, ता. अलिबाग, जि.रायगड, १) गट नं.८७, क्षेत्र ०-६५-७० हे. आर., पो.ख. ०-०५-६० हे.आर. एकूण क्षेत्र ०-७१-३० हे.आर. आकार १२.०५ रु.पै. या मिळकतीपैकी प्रकाश दामोदर पाटील यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२७-२० हे. आर ., पो.ख. ०-०५-६० हे.आर., एकुण क्षेत्र ०-३२-८० हे. आर. आकार ४.९९ रू. पैसे ही मिळकत तसेच २) गट नं. ८७, क्षेत्र ०-६५-७० हे. आर., पो. ख. ०-०५-६० हे. आर., एकूण क्षेत्र ०-७१-३० हे. आर. आकार १२.०५ रु. पै. पैकी क्षेत्र ०-२२-५० हे. आर. या मिळकती पैकी ज्योती प्रकाश पाटील यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २७/१०/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## निवडक

### दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर

**कोलकाता :** भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ सोमवारी जाहीर करण्यात आला. दुखापतीतून सावरल्यानंतर कर्णधार टेम्बा बावुमा संघात परतला. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथे आणि दुसरा कसोटी सामना २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे खेळला जाईल. सप्टेंबरमध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या सामन्यात बावुमाला दुखापत झाली होती. त्यानंतर तो नवीन वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप सायकलमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेला मुकला होता, जी १-१ अशी बरोबरीत संपली. या आठवड्यात पाकिस्तानमध्ये सुरू होणाऱ्या कोणत्याही व्हाईट-बॉल सामन्यातही तो खेळणार नाही. पाकिस्तान मालिकेसाठी बहुतेक संघ कायम ठेवण्यात आला आहे, डेव्हिड बेडिंगहॅमची जागा बावुमाने घेतली आहे.टेम्बा बावुमा (कर्णधार), एडन मार्करम, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स, काइल वेरेन, डेवाल्ड ब्रेविस, झुबेर हमझा, टोनी डी जॉर्जी, कॉर्बिन बॉश, विआन मुल्डर, मार्को जॅनसेन, केशव महाराज, सेनुरान मुथुसामी, सिमॉन हरमेरडा, कागिसो रबाडा यांची संघात निवड करण्यात आली आहे.

### श्रेयस अय्यर आयसीयुमध्ये उपचार

**सिडनी :** भारतीय एकदिवसीय संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरला सिडनी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तो सध्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या सामन्यादरम्यान झालेल्या बरगडीच्या



दुखापतीमुळे त्याला अंतर्गत रक्तस्त्राव होत आहे.शनिवारी (२५ ऑक्टोबर) तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अय्यरने बॅकवर्ड पॉइंटवरून ॲलेक्स कॅरीला बाद करण्यासाठी एक शानदार झेल घेतला. यादरम्यान त्याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली. तो ड्रेसिंग रूममध्ये परतला आणि त्याला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले. श्रेयस गेल्या काही दिवसांपासून आयसीयूमध्ये आहे. रिपोर्ट्स आल्यानंतर, अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याचे आढळून आले आणि त्याला ताबडतोब दाखल करावे लागले. त्याला दोन ते सात दिवस निरीक्षणाखाली ठेवले जाईल, कारण रक्तस्त्राव संसर्गात पसरण्यापासून रोखणे महत्वाचे आहे, असे एका सूत्राने पीटीआयला सांगितले.



### कसोटीतून वगळल्याने करुण निराश

**कर्नाटक** :कर्नाटकचा फलंदाज करुण नायरने कसोटी संघातून वगळल्यानंतर मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर संताप व्यक्त केला आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत आठ वर्षांनी नायर भारतीय कसोटी संघात परतला, परंतु त्याची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी होती. परिणामी, वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याचा समावेश करण्यात आला नाही.भारतीय संघात स्थान न मिळाल्याने मी निराश झालो आहे आणि मी यापेक्षाही चांगल्या कामगिरीला पात्र होतो, असे नायरने २०२५-२६ च्या रणजी ट्रॉफीच्या दुसऱ्या फेरीत कर्नाटकविरुद्ध नाबाद १७४ धावा काढल्यानंतर सांगितले. २५ वे प्रथम श्रेणी शतक झळकावल्यानंतर तो म्हणाला, गेल्या दोन वर्षातील माझ्या कामगिरीकडे पाहता, मला वाटते की मला चांगल्या संधी मिळायला हव्या होत्या. मला फक्त एकापेक्षा जास्त मालिका मिळायला हव्या होत्या. लोकांचे स्वतःचे मत असू शकते, परंतु वैयक्तिकरित्या, मला वाटते की मी यापेक्षा खूप चांगल्या संधींना पात्र आहे.वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतून नायरला वगळण्याचे कारण मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, इंग्लंडमध्ये आम्हाला त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. चार कसोटी सामन्यांमध्ये फक्त एक अर्धशतक पुरेसे नव्हते.जूनच्या सुरुवातीला शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत नायरने चार सामने खेळले. ही मालिका २-२ अशी बरोबरीत संपली.दुखापतीमुळे काही काळासाठी मैदानाबाहेर राहिल्यानंतर, नायरची दुलीप ट्रॉफी आणि ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध भारत अ संघाच्या मालिकेसाठी निवड झाली नाही.

# सेमी फायनलची रंगत

## आयसीसी वनडे वूमन्स वर्ल्ड कप २०२५

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयसीसी वनडे वूमन्स वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेतील साखळी फेरीचा शेवट झाला आहे. साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात यजमान भारत विरुद्ध बांगलादेश आमनेसामने होते. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आलेला हा सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करण्यात आला. आता या सामन्यानंतर उपांत्य फेरीचा थरार रंगणार आहे. एकूण ४ संघात वर्ल्ड कप ट्रॉफी जिंकण्यासाठी जोरदार चुरस पाहायला मिळणार आहे.

उपांत्य फेरीत टीम इंडिया, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या संघांनी धडक दिली आहे. उपांत्य फेरीतील सामन्यांना २ दिवसांच्या विश्रांतीनंतर सुरुवात होणार आहे. सेमी फायनल राउंडचा थरार २९ सप्टेंबरपासून रंगणार आहे. या दोन्ही सामन्यांना भारतीय वेळेनुसार दुपारी ३





वाजता सुरुवात होणार आहे.

सेमी फायनलमधील पहिल्या सामन्यात इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका आमनेसामने असणार आहेत. हा सामना २९ ऑक्टोबरला गुवाहाटीतील बारसापारा क्रिकेट स्टेडियममध्ये होणार आहे. दोन्ही संघ साखळी फेरीनंतर पुन्हा आमनेसामने असणार आहेत. इंग्लंडने साखळी फेरीत दक्षिण आफ्रिकेचा १० विकेट्सने धुव्वा उडवला होता. त्यामुळे दक्षिण आफ्रिका या पराभवाची परतफेड करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवणार की इंग्लंड पुन्हा विजय मिळवत अंतिम फेरीत धडक देणार? याकडे चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

दुसऱ्या सेमी फायनलमध्ये टीम इंडियासमोर गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचं आव्हान असणार आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला साखळी फेरीत पराभूत केलं होतं. भारताला साखळी फेरीत ३३० धावा करुनही पराभूत व्हावं लागलं होतं. मात्र उपांत्य फेरीत आर या पार अशी लढाई आहे. तसेच वूमन्स टीम इंडियाकडे साखळी फेरीतील पराभवाचा हिशोब करण्याचीही संधी आहे.

### ४ संघाचं साखळी फेरीतच पॅकअप

**दरम्यान पाकिस्तान, बांगलादेश, सहयजमान श्रीलंका आणि न्यूझीलंड या ४ संघांचं आव्हान हे साखळी फेरीतच संपुष्टात आलं. पाकिस्तान या स्पर्धेतील सर्वात अपयशी टीम ठरली. पाकिस्तानला एकही सामना जिंकता आला नाही.**

मात्र भारताला अंतिम फेरीत पोहचण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा विजयरथ रोखावा लागणार आहे. ऑस्ट्रेलियाने एकही सामना गमावलेला नाही. त्यामुळे भारतासाठी ऑस्ट्रेलिया विरुद्धचा सामना आव्हानात्मक असणार आहे. हा सामना नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियममध्ये होणार आहे. आता उपांत्य फेरीत कोण कुणाला पराभूत करतो? याकडे चाहत्यांची करडी नजर असणार आहे.

# पहिल्या टी-२० मध्ये झम्पाच्या जागी संघा

**। कॅनबेरा । वृत्तसंस्था ।**

२९ ऑक्टोबरपासून भारताविरुद्ध होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या संघातून ॲडम झम्पाला वगळण्यात आले आहे. त्याच्या जागी लेग-स्पिनर तनवीर संघाची निवड करण्यात आली आहे.





झम्पाने वैयक्तिक कारणांमुळे मालिकेतील पहिल्या सामन्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सोमवारी पुष्टी केली की संघा कॅनबेरा येथे संघात सामील होतील, जिथे बुधवारी मनुका ओव्हल येथे पहिला टी-२० सामना खेळला जाईल.२३ वर्षीय तन्वीर संघाने २०२३ मध्ये शेवटचा टी२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. त्या काळात त्याने ७ सामन्यात १० विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये त्याची सर्वोत्तम कामगिरी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध डर्बनमध्ये ३१ धावांत ४ बळी ही होती.

संघा अलिकडेच उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. तो एकदिवसीय कपमध्ये न्यू साउथ वेल्स ब्लूजसाठी सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला, त्याने फक्त १४.१० च्या सरासरीने १० विकेट्स घेतल्या. याव्यतिरिक्त, अलिकडच्या भारत दौऱ्यात कानपूरमध्ये खेळल्या गेलेल्या तीन लिस्ट ए सामन्यांमध्ये त्याने सात विकेट्स घेतल्या.

दुसरीकडे, ॲडम झम्पाची अनुपस्थिती वैयक्तिक कारणांमुळे आहे. त्यांची पत्नी त्यांच्या दुसऱ्या मुलाची अपेक्षा करत आहे, म्हणूनच झम्पा भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्याला मुकला. त्यामुळे, झम्पाच्या अनुपस्थितीत संघाला संधी देण्यात आली आहे.

# प्रतीका रावल जखमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बांगलादेशविरुद्ध महिला विश्वचषक सामन्यादरम्यान प्रतिका रावलला दुखापत झाली होती. तिच्या गुडघ्याला आणि घोट्याला दुखापत झाली. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर रविवारी होणारा हा सामना सततच्या पावसामुळे रद्द करण्यात आला.

रावलच्या उपांत्य फेरीत सहभागी होण्याबाबत शंका आहे. भारत आधीच उपांत्य फेरीत पोहोचला आहे आणि ३० ऑक्टोबर रोजी त्याच स्टेडियम वर ऑस्ट्रेलियाशी सामना करेल.

बांगलादेशच्या डावात २१ व्या षटकात प्रतिका रावल चेंडू पकडण्यासाठी धावली. पावसामुळे मैदान ओले होते,





ज्यामुळे ती घसरून पडली. तिला स्ट्रेचरची आवश्यकता नव्हती, परंतु इतर खेळाडूंच्या मदतीने ती लंगडत मैदानाबाहेर पडली.

बीसीसीआयने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, टीम इंडियाची अष्टपैलू खेळाडू प्रतीका रावलला क्षेत्ररक्षण करताना गुडघा आणि घोट्याला दुखापत झाली आहे. वैद्यकीय पथक तिच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

# जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत वैदेहीला 'सुवर्ण'

**। खरोशी । वार्ताहर ।**

अलिबाग येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये कराटे विभागात रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील पिरकोन विद्यालयातील वैदेही योगेश घरत हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकावले आहे.

जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धेत १५ तालुक्यामधून कराटेपटूनी सहभाग घेतला होता.वैदेही घरत हिने १७ वर्षे वयोगट आणि ५० ते ६० वजनी गटात सहभाग घेतला होता. सुरुवातीच्या फेऱ्यापासून वैदही घरत हीचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता प्रत्येक सामन्यात तिने प्रतिस्पर्धकावर वर्चस्व राखले.शेवटच्या क्षणापर्यंत





उत्सुकता टिकून असलेल्या या लढतीत वैदहीने विजय मिळवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.

या यशाबद्दल शाळेच्या स्कूल कमिटीचे चेअरमन जीवन गावंड, दहागाव माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम. के. आदींनी अभिनंदन केले.

शाळेच्या प्राचार्य सौ ए.ए. पाटील यांनी सांगितले की आमचे विद्यार्थी केवल अभ्यासातच नाही तर क्रीडा क्षेत्रातही चमकत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे. तसेच विद्यालयाचे क्रीडा प्रमुख डाढाले बी.बी. यांनी खूप मेहनत घेतली, तसेच विद्यालयातील पाटील पी एम, म्हात्रे एस आर, सौ. पाटील एस सी. सौ पाटील एम एस आणि सर्व सेवक वृंद यांनी वैदेहीचे अभिनंदन केले.

# इंग्लंडने न्यूझीलंडला ८ गड्यांनी हरवले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला एकदिवसीय विश्वचषकातील इंग्लंडने त्यांचा शेवटचा लीग सामना जिंकला आणि न्यूझीलंडचा ८ गडी राखून पराभव केला. या साम न्याने न्यूझीलंडच्या स्पर्धेतील मोहिमेचा शेवट झाला. त्यानंतर संघाची कर्णधार सोफी डेव्हाईनने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. विशाखापट्टणम येथील डीवायएस राजशेखर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडने फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांचा डाव फक्त १६८ धावांवर संपला. इंग्लंडने २९.२ षटकांत केवळ दोन विकेट गमावून लक्ष्य गाठले. ८६ धावा करणाऱ्या एमी जोन्सला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. संघाने सहाव्या षटकात सुझी बेट्सची विकेट गमावली, ती फक्त १० धावा काढू शकली. त्यानंतर जॉर्जिया





प्लिमरने अमेलिया केरला साथ दिली, परंतु दोघेही सलग चेंडूंवर बाद झाल्या. प्लिमरने ४३ आणि अमेलियाने ३५ धावा केल्या.कर्णधार सोफी डेव्हाईनने न्यूझीलंडला स्थिरावण्याचा प्रयत्न केला. ब्रुक हॅलिडे आणि मॅडी ग्रीन अनुक्रमे ४ आणि १८ धावांवर बाद झाल्या. डेव्हाईनही संघाच्या धावसंख्या १५५ वर असताना बाद झाली. त्यानंतर, संघाने त्यांचे शेवटचे चार बळी फक्त १३ धावांत गमावले.

डेव्हाईन २३ धावा, इसाबेल गेज १४ धावा आणि जेस केर १० धावा काढून बाद झाली. ली ताहुहूने २ धावा आणि एडन कार्सनने १ धावा केल्या. रोझमेरी मेयरला खातेही उघडता आले नाही. इंग्लंडकडून लिन्से स्मिथने ३ बळी घेतले. नताली सायव्हर-ब्रंट आणि ॲलिस कॅप्सीने प्रत्येकी २ बळी घेतले. चार्ली डीन आणि सोफी एक्लेस्टनने प्रत्येकी १ बळी घेतला. एक फलंदाज धावबाद झाली.

१६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडने दमदार सुरुवात केली. टॅमी ब्यूमोंट आणि यष्टीरक्षक एमी जोन्स यांनी ७५ धावांची सलामी भागीदारी केली. ब्यूमोंट ४० धावांवर बाद झाली. त्यानंतर कर्णधार सेव्हर-ब्रंटने ३३ धावा करून संघाला १५० धावांच्या पुढे नेले.शेवटी, डॅनी वायट-हॉजने एमी जोन्ससह २९.२ षटकांत संघाला विजय मिळवून दिला. जोन्स ८६ आणि डॅनी २ धावांवर नाबाद राहिल्या. न्यूझीलंडकडून सोफी डेव्हाईन आणि ली ताहुहू यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

कर्णधार सोफी डेव्हाईनने २००६ मध्ये एकदिवसीय क्रिकेटम ध्ये पदार्पण केले. तिने संघासाठी १५९ सामने खेळले आणि नऊ शतकांसह ४२७९ धावा केल्या. तिने १८ अर्धशतकेही केली. तिच्या नेतृत्वाखाली संघाने गेल्या वर्षी टी-२० विश्वचषक जिंकला, परंतु एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचण्यात अपयशी ठरला.

# 'टीम इंडियाला माझी गरज'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईचा माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज अजिंक्य रहाणे याने रणजी ट्रॉफी स्पर्धेतील दुसऱ्या फेरीत छत्तीसगड विरुद्ध चाबूक दीडशतकी खेळी केली. अजिंक्यने या खेळीनंतर टीम इंडियातील कमबॅकबाबत प्रतिक्रिया दिली.



टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज आणि भारताला आपल्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियात ऐतिहासिक मालिका विजय मिळवून देणारा अजिंक्य रहाणे गेल्या अनेक वर्षांपासून कमबॅकच्या प्रतिक्षेत आहे. अजिंक्य फक्त टेस्ट या एकमेव फॉर्मेटमध्ये खेळतो. मात्र त्यानंतरही निवड समितीने त्याला संधी देण्याचा साधा विचारही केलेला नाही. सध्या अजिंक्य रणजी ट्रॉफी स्पर्धेत खेळतोय. अजिंक्यने या स्पर्धेतील छत्तीसगड विरूद्धच्या सामन्यात खणखणीत शतक करत कमबॅकसाठी दावा ठोकला आहे. तसेच अजिंक्यने या खेळीनंतर त्याच्या मनात असलेलं सर्व बोलून दाखवलं.

अजिंक्यने केलेल्या खेळीमुळे मुंबईला ४०० पार मजल मारता आली. मुबंईने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ८ विकेट्स गमावून ४०६ धावा केल्या आहेत. अजिंक्यने या ४०६ धावांत सर्वाधिक योगदान दिलं. अजिंक्यने फर्स्ट क्लास क्रिकेटमधील ४२ वं शतक झळकावलं. मुंबईची निराशाजनक सुरुवात झाली. मुंबईने ३८ धावांवर ३ विकेट्स गमावल्या. त्यानंतर रहाणेने नेहणीप्रमाणे आपल्या खांद्यावर जबाबदारी घेत मुंबईला सावरलं. अजिंक्यने ३०३ बॉलमध्ये १५९ रन्स केल्या. अजिंक्यच्या खेळात २१ चौकारांचा समावेश होता.

## बार्सिलोनाचा २-१ ने पराभव | एमबाप्पे आणि बेलिंगहॅमचा प्रत्येकी एक गोल

# एल क्लासिको सामन्यानेला लीगाची सुरुवात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रविवारी झालेल्या ला लीगा सामन्यात रिअल माद्रिदने बार्सिलोनाचा २-१ असा पराभव केला. या सामन्यातून स्पॅनिश फुटबॉल लीग, ला लीगाच्या नवीन हंगामाची सुरुवात झाली.

पहिला सामना एल क्लासिको होता, जो बार्सिलोना आणि रिअल माद्रिद यांच्यात खेळला जाणारा फुटबॉल सामना होता. सँटियागो बर्नाबेउ स्टेडियमवर झालेल्या रोमांचक सामन्यात माद्रिदने चार सामन्यांची पराभवाची मालिका मोडली. या विजयासह, माद्रिदने पॉइंट टेबलमध्ये बार्सिलोनावरील आपली आघाडी पाच गुणांपर्यंत वाढवली.

रियल माद्रिदकडून फ्रेंच स्टार कायलियन एमबाप्पे आणि इंग्लिश मिडफिल्डर ज्यूड बेलिंगहॅम यांनी प्रत्येकी गोल केले. इंग्लिश मिडफिल्डर ज्यूड बेलिंगहॅमने सहाय्य करून २२ व्या मिनिटाला एमबाप्पेने पहिला गोल केला.बार्सिलोनाने लवकरच प्रत्युत्तर देत ३८ व्या मिनिटाला फर्मिन लोपेझच्या गोलने १-१ अशी बरोबरी साधली. तथापि, ४३ व्या मिनिटाला बेलिंगहॅमने गोल करून



रियलला आघाडी मिळवून दिली, जी त्यांनी शेवटपर्यंत टिकवून ठेवली.

दुसऱ्या हाफमध्ये ५२ व्या मिनिटाला पेनल्टी मिळाल्यावर रिअलला आणखी एक संधी मिळाली, परंतु बार्सिलोनाचा गोलकीपर वॉयसेक स्झेस्नीने एका शानदार बचावासह एमबाप्पेचा किक वाचवला. सामन्याच्या शेवटच्या क्षणी बार्सिलोनाच्या पेड्रीला लाल कार्ड दाखवण्यात आले, ज्यामुळे दोन्ही संघांच्या बेंच खेळाडूंमध्ये वाद झाला. सामना संपल्यानंतर काही काळ वाद सुरू राहिला. रिअल माद्रिदचा व्हिनिसियस ज्युनियर आणि बार्सिलोनाचा युवा स्टार लामिन यमल हे देखील यात सहभागी होते. रिअल माद्रिदने या हंगाम त आतापर्यंत १३ पैकी १२ सामने जिंकले आहेत. त्यांचा एकमेव पराभव सप्टेंबरमध्ये ॲटलेटिको माद्रिदविरुद्ध २-५ असा झाला होता.

## हंसिका, सारिकाला रौप्यपदक

# युवा जागतिक कुस्तीत भारताला सर्वसाधारण जेतेपद

**। नोवी साद । वृत्तसंस्था ।**

युवा जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील भारताची वैयक्तिक सुवर्णपदकाची प्रतीक्षा आणखी लांबली आहे. सर्बिया येथे झालेल्या २३ वर्षांखालील या स्पर्धेत हंसिका लांबा आणि सारिका मलिक यांना अखेरीस रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मात्र, भारताने या स्पर्धेत एकूण सात पदके जिंकताना सर्वसाधारण जेतेपद पटकावले.

हंसिकाला ५३ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत जपानच्या हरुना मोरिकावाकडून ०-४ असा पराभव पत्करावा लागला. अंतिम लढतीच्या पहिल्या फेरीत हंसिकाने निराशाजनक खेळ केला. मोरिकावाने तिला मॅटवर पाडत पहिला गुण कमावला. त्यानंतर नकारात्मक खेळामुळे हंसिकाने आणखी गुण गमावले. ती ०-३ अशी पिछाडीवर गेली.

दुसरीकडे, गतवर्षी २० वर्षांखालील आशियाई स्पर्धेत रौप्यपदक मिळवणाऱ्या सारिकाला आता युवा जागतिक स्पर्धेतही पदकाचा रंग बदलता आला नाही. तिला गतवर्षी या स्पर्धेत रौप्यकमाई करणाऱ्या जपानच्या रुका नातामीला सामोरे जावे लागले. अंतिम लढतीच्या पहिल्या फेरीत नातामीच्या नकारात्मक खेळामुळे सारिकाला पहिला गुण मिळाला. त्यानंतर सारिकाने अधिक ताकदीने खेळताना नातामीवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला, परंतु नातामीने चपळाई दाखवत सारिकाला मॅटच्या कोपऱ्यावर नेत दोन गुण मिळवले आणि २-१ अशी आघाडी घेतली. त्यानंतर तिने ही आघाडी राखत सुवर्णपदकाची कमाई केली.

या स्पर्धेत हंसिका आणि सारिकाने रौप्यपदक, तर निशू, नेहा शर्मा, पुलकित, सृष्टी आणि प्रिया मलिक यांनी कांस्यपदक मिळवले. त्यामुळे भारताने या स्पर्धेची सात पदकांसह सांगता केली. भारतीय संघ सर्वाधिक १२५ गुणांसह सर्वसाधारण जेतेपदाचा मानकरी ठरला

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)